स्तवन ॥ कांहींनहोयीजेआपण ॥ मगउरेपूर्णतेंतूंचि ॥ २२ ॥ पिंडब्रम्हांडाचाभ्रम
झाला ॥ तोतुमचेकृपेनेंसर्वगेला ॥ जळींलवणाप्रमाणेंमिळाला ॥ प्रसंगघडलाअसे
कीं ॥ २३ ॥ आतांमीनाहींमजआंत ॥ अवघासद्गुरुचिभासत ॥ प्रगटलीप्रकाशजो
त ॥ झालाअंतमीतूंपणाचा ॥ २४ ॥ ऐसीयासद्गुरुनिधाना ॥ तुझामहिमानकळेचि
कोण्हा ॥ म्हणवोनभवजन्माचीयातना[१] ॥ भोगितीनानामूढमती ॥ २५ ॥ एकींध
रितांज्ञानाभिमान ॥ म्हणतीआम्हीवेदज्ञसंपन्न[२] ॥ सद्गुरुकायसांगेलज्ञान ॥ आम्ही
वित्पन्नसर्वपदार्थी ॥ २६ ॥ जेणेंसांगीतलेंगायत्रींसीं[३] ॥ तोचिसद्गुरुआम्हासीं ॥ ऐ
सेंम्हणोनीसद्गुरूसीं ॥ सर्वस्वेंसीअंतरले ॥ २७ ॥ परिओमित्येकाक्षरंब्रम्ह[४] ॥ हेंत्या

---

१ संसारामध्यें जन्मघेण्याची २ वेदाचाअर्थ जाणणारे ३ गायत्रीमंत्रास ४ ओंम्हणून हें एक अक्षरआहे

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सींनकळेचिवर्म ॥ नानाउपासनेचाभ्रम ॥ काम्यंकर्मेंकरिताती ॥ २८ ॥ आपणआ
पणासींजाणत ॥ आणिदुसरियासींजाणोंजात ॥ तेणेंचिहोतअसेभ्रांत ॥ नाहींहित
आपुला ॥ २९ ॥ देहचिमीम्हणवोनमानिला ॥ तेणेंजीवदशेंआला ॥ जीव
दशेंसद्गुरुला ॥ प्राणीअंतरलासहजचि ॥ ३० ॥ ज्यासींनकळेसद्गुरुचेंमहिमान ॥
तोनागवलानरदेहायेऊन ॥ नानाव्युत्पत्तीनेंकथीज्ञान ॥ तेहिजाणावांवची ॥ ३१ ॥
जैसींपोरेंखेळखेळती ॥ पात्रींभोजनावैसती ॥ परस्परेंआदरकरिती ॥ जेवा
म्हणतीएकमेका ॥ ३२ ॥ वाढणारआदरकरित ॥ एकम्हणतीझालोंतृप्त ॥ तैसेंस
द्गुरुविनाज्ञानकथित ॥ परिसत्यतेंनसेचकीं ॥ ३३ ॥ पोरेंलांडामाजीजेविलीं ॥ प
रिपोटेंनाहींभरलीं ॥ तैसीसद्गुरुविणज्ञानकथनीकेली ॥ परिकल्पनागेलीनाहीं
कीं ॥ ३४ ॥ जोंवरीकल्पनागेलीनाहीं ॥ तोंवरीज्ञानतेंअज्ञानपाहीं ॥ कांजेणेंने
णेंअनुभवसोई ॥ नकळेकांहींहितत्यासीं ॥ ३५ ॥ सद्गुरुविनाऐसी ॥ प्राणी
पडिलेअपभ्रंशीं ॥ तुमचेकृपेनेंमजदीनासी ॥ भ्रांतीमानसींनसेकीं ॥ ३६ ॥ सुख
दुःखमनेंकरून ॥ बद्धमुक्तमनेंचिजाण ॥ त्यामनाचेंकेलेंनिरशन ॥ ब्रम्हपूर्णझालों
कीं ॥ ३७ ॥ तुम्हींपूर्वींजेंजेंसांगीतलें ॥ तेंमजप्रत्ययासआलें ॥ चौदेहातेंनिरसिलें ॥
वेगळेंकेलेंमजस्वामी ॥ ३८ ॥ ध्रुवासींअढळपददिधलें ॥ त्याहोनमजथोरकेलें ॥ कां

१ पुत्रादिकअनेकफळांचीइच्छाधरूनजेंकर्मकरणें तें २ [illegible] ३ आग्रह ४ [illegible] [illegible]पणानें ५ सद्गुरुवांचून ६ भलत्याअक्षरानध्यें

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जेंजन्ममरणाचेंभयहरलें ॥ ब्रम्हत्वआलेंअंगासीं ॥ ३९ ॥ जेंजेंआलेंआकारास ॥
तेंतेंपावलेंनाशास ॥ ध्रुवपदकायअविनाश ॥ गेलीनिःशेषकल्पना ॥ ४० ॥ ध्रुव
पदहीनांवातेंपावलें ॥ एकअविनाशवस्तूचिउरलें ॥ जेंगुह्याचेंगुह्यबोले ॥ जेंसखो
लसर्वांहोनी ॥ ४१ ॥ तेंगुह्यमजसांगोन ॥ केलेंस्वयेंचिब्रम्हपूर्ण ॥ आतांनाहींद्वैत
भान ॥ कोंदलेंघनस्वरूप ॥ ४२ ॥ आत्मप्रचितशास्त्रप्रचित ॥ आणिसद्ग्रंथवेदां
त ॥ जेणेंबोधेमाझेंचित्त ॥ तेंत्वरितकेलेंस्वामीं ॥ ४३ ॥ जेंप्राप्तदत्तगोरक्षासी ॥ नि
वृत्तीज्ञानदेवासीं ॥ मुक्ताईचांगदेवपर्येसीं ॥ ज्याज्ञानासींअनुसरले ॥ ४४ ॥ आ
णिकसिद्धसाधऋषिमुनी ॥ व्याससनकादिकआदिकरोनी ॥ स्वयेंचिब्रम्हराहिले
होवोनी ॥ तेंगुह्यमजलागोनीसांगीतलें ॥ ४५ ॥ थोरकेलाउपकार ॥ ब्रम्हरूपभा
सेचराचर ॥ मीहीअसेंत्याचमाझार ॥ गेलाविकारभ्रांतीचा ॥ ४६ ॥ जैसीकंठींची
माळा ॥ जेणेंस्मरिजेंघननिळा ॥ तोभुमीपडतांसर्पकाळा ॥ लोकांसकळांभासला
॥ ४७ ॥ सर्पसर्पम्हणवोन ॥ झालेतीकंपायमान ॥ पहातांदीपआणोन ॥ माळाम्ह
णवोनीवोळखिली ॥ ४८ ॥ तैसेंहेंअवघेंचिब्रम्ह ॥ परिमायेचाझालाहोताभ्रम ॥
तोपाहतांज्ञानदीपेंकरोन ॥ आत्मारामकोंदला ॥ ४९ ॥ जैसागेलासर्पभासाचा
कंटाळा ॥ मगमाळातीघातलीगळां ॥ तैसेंमजझालेंकृपाळा ॥ भासलेंडोळांस्व

१ एकत्व २ महाभाषादिग्रंथ ३ कृष्ण ४ संशय

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रूपतें ॥ ५० ॥ जैसेंगगनीहोतेंआभाळ ॥ तेंविरोनीगगनचिझालेंकेवळ ॥ तैसा
भ्रमजावोनियांसकळ ॥ भासलीनिर्मळवस्तुची ॥ ५१ ॥ गगनामाजीआभाळ
झालें ॥ त्यासीसबाह्यगगनेंव्यापिलें ॥ तैसेंदृश्यब्रम्हींभासलें ॥ परंतुसंचलेंब्र
म्हचीं ॥ ५२ ॥ सागरींचेतरंग ॥ मिळोनीसागरींझालेंभंग ॥ तैसेंब्रम्हींआ
टलेंजग ॥ उरलेंचांगस्वरूप ॥ ५३ ॥ जैसेंनगचिसोनेंझालें ॥ तैसेंजगचि
ब्रम्हत्वआलें ॥ मींतूंपणाचेंभानउडालें ॥ असेंसंचलेंपरब्रम्ह ॥ ५४ ॥ ऐ
सामजअनुभवझाला ॥ तुमचेकृपेनेंसंदेहगेला ॥ आतांमीचमाझाउरला ॥ ठाव
द्वैतोलानसेचकीं ॥ ५५ ॥ आतांद्वैततेंचिअद्वैतझालें ॥ जैसेंसर्पत्वरज्जूचेंगेलें ॥ कीं
स्वप्नजागृतींतआटलें ॥ एकउरलेंपरब्रम्ह ॥ ५६ ॥ उरलेंआणिनाहीं ॥ हेहीकल्प
नादुजीनाहीं ॥ मींतूंजातांसर्वांठायीं ॥ सहजचिपाहींसंचलें ॥ ५७ ॥ आतांमीतूंप
णझालेंएक ॥ गेलेंअनेकाचेंस्वप्नदेख ॥ उरलेंस्वरूपप्रकाशक ॥ अनुभवसुखलाभ
तां ॥ ५८ ॥ जोंवरीस्वरूपानुभवझालानाहीं ॥ तोंवरीहेंनकळेचिकांहीं ॥ ऐसेंमज
कळोंआलेंचिपाहीं ॥ तुमचेंपायींलागतां ॥ ५९ ॥ स्वामीरूपतेंउघडेंचिआहे ॥ जैसें
तैसेंप्रकाशलेंपाहें ॥ सर्वव्यापोनीलिप्तनोहे ॥ जेंजाणताहेंसर्वांतें ॥ ६० ॥ जेंस्व
प्रकाशेंकोंदलें ॥ जेणेंसर्वांतेंदेखिलें ॥ त्यातेंजनेंकेसेंवंचिलें ॥ नवलवाटलेंमजला

१ विरूनजाऊन २ निर्गुणरूप ३ अलंकार ४ संशय ५ ढळिल मातणें ६ स्वरूपानुभव

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गीं ॥ ६१ ॥ जेंमनाचेंमन ॥ चित्ताचेंचित्तजाण ॥ बुद्धीचाबोधकआपण ॥ त्यातेंजन
कैसेचुकले ॥ ६२ ॥ जोप्राणाचाप्राणदेख ॥ जोइंद्रियांचाचाळक ॥ जोअर्काचाही
आदिअर्क ॥ त्यासींलोकनेणती ॥ ६३ ॥ ज्याचेसत्तेनेंवर्त्ततातीं ॥ ज्यामाजीनित्य
आहेती ॥ त्यास्वरूपातेंनेणती ॥ हेस्थितीअपूर्व ॥ ६४ ॥ जैसेंजळामाजीमत्स्य
असोन ॥ नेणतिजळालागोन ॥ तैसेंब्रम्हींचअसतांआपण ॥ कायम्हणोनचु
कले ॥ ६५ ॥ वेदशास्त्रेंहीपढती ॥ असेपुराणाचीव्युत्पत्ती ॥ चौसष्टीकळाहीजे
जाणती ॥ तेहीनेणतीस्वरूपतें ॥ ६६ ॥ कांजेस्वरूपातेंजाणते ॥ तरीशब्देंब्रम्हीं
नभरते ॥ साक्षीहोऊनअसते ॥ तेटाकतेदेहअभिमाना ॥ ६७ ॥ देहअभिमान
आहेम्हणवोन ॥ प्रासनाहींकळतेंपूर्ण ॥ स्वयेंअसतांब्रम्हआपण ॥ कायम्हणोन
चुकले ॥ ६८ ॥ जेज्ञातेआपणाम्हणविती ॥ दुजयातेंउपदेशकरिती ॥ गीताभाग
वतवाचिती ॥ परीअहंकृतीनजाय ॥ ६९ ॥ स्वरूपाचीखूणासांगती ॥ आणिस्व
रूपस्थितीनेंनरहाती ॥ हेंउकलोनियांगुरुमूर्ती ॥ मजप्रतिसांगावें ॥ ७० ॥ जेजे
कांहींनेणतीज्ञानासी ॥ त्यांचीवार्ताकायसी ॥ जाणतीतेभुललेआपणासीं ॥ व्या
पकातेंनेणती ॥ ७१ ॥ तुम्हीम्हणालपुढतीपुढती ॥ कांपुसतोसमूढमती ॥ तुजसां
गीतलीजेस्थिती ॥ तेचिप्रचीतिराहेरे ॥ ७२ ॥ स्वामीनींजोकेलाउपदेश ॥ तेणेंम

वेदाचेठायीं २ अहंपणा

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जझालाप्रकाश ॥ ठावनाहींदृश्यभावमेस ॥ वस्तुसर्वस्वकोंदली ॥ ७३ ॥ मीझालों
निःसंदेहंआतां ॥ उडालीद्वैताचीवार्ता ॥ परीपुसलेतेसद्गुरुनाथा ॥ सर्ववृतांतसां
गावे ॥ ७४ ॥ तंवसद्गुरूबोलिलेआपण ॥ रत्नाकरातूंतोमहाअज्ञान ॥ तुझातूंहिपां
हेंविचारोन ॥ मगतूंप्रश्नकरीसुखें ॥ ७५ ॥ जोंवरीतुजअनुभवाआलेंनव्हतें ॥ तो
वरीकायकळतहोतें ॥ देहमीमानोनविषयातें ॥ अतिआर्तेंसेविसी ॥ ७६ ॥ तेंतूंका
यविसरलासी ॥ जेंमलापुसोंलागलासी॥ जैसारंकपावलाराज्यासीं ॥ रंकपणासीं
बिसरला ॥ ७७ ॥ जोआपणझालासुखी ॥ तोम्हणेहेकायम्हणवोनदुःखी ॥ तैसीतु
झीतुजहोतांओळखी ॥ गेलासिकोंविसरोनी ॥ ७८ ॥ जोप्यालाअसेअमृत ॥ तो
म्हणेहेचकांमरत ॥ तैसीतुझीझालीस्थित ॥ म्हणवोनपुसतअससी ॥ ७९ ॥ जोरा
हिलासूर्यापासीं ॥ त्यानाहींदिवसनिशी ॥ तुझीदशाझालीतैसी ॥ म्हणवोननेणसी
मागीलतें ॥ ८० ॥ उदराबाहेरबाळयेतां ॥ नेणेउदरामाजीलव्यथा ॥ तैसेंतुजझा
लेंरेसुता ॥ ब्रम्हानुभवतालोंधलीसे ॥ ८१ ॥ तूंतोस्वतांब्रम्हझालासी ॥ म्हणवोनब्र
म्हरूपजनदेखसी ॥ हेंज्ञानप्राप्तनाहींजनासीं ॥ तेंयासींकायजाणे ॥ ८२ ॥ जैसेंध
नआहेघराभीतरीं ॥ तेंलिहिलेंआहेवहिवरी ॥ जेंचवथ्याकोपऱ्यासींनिर्धारी ॥ क
ढईभरीआहेकीं ॥ ८३ ॥ तेंवाचितांजातांचिझालेंसमाधान ॥ परीनजायचिदुर्बळप

१ निःसंशय २ प्राप्तझाली

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ण ॥ तैसेंविद्याभ्यासकरितांजाण ॥ नोहेज्ञानसर्वथा ॥ ८४ ॥ चारीकोपरेघरा
सीजाण ॥ परीतेंकोणतेकोपऱ्यासींआहेधन॥हेंत्यासींनाहींज्ञान ॥ म्हणवोनदुर्बळते
॥ ८५ ॥ तैसीनानाविद्येंचीव्युत्पत्ती ॥ वेदशास्त्रादिपद्धती ॥ त्याचाअर्थहीसांगती ॥
परीतेस्थितीपालटेना ॥ ८६ ॥ सुतासींजिंजेंपढविलें ॥ तेंतेंचितोबोले ॥ परीअर्थअ
न्वयातेंचुकले ॥ तैसेंझालेंविद्वांसा ॥ ८७ ॥ स्वयेंब्रम्हचिआहेती ॥ नित्यब्रम्हामाजी
चअसती ॥ जैसेपक्षीगगनीचउडती ॥ परीतेनेणतीगगनातें ॥ ८८ ॥ कापूरनेणेंप
रिमळासीं ॥ साखरनेणेंचिगोडीसीं ॥ दीपनेणेंप्रकाशासीं ॥ दशातैसीझालीजना
॥ ८९ ॥ आकाशनेणेंअवकाशालागोन ॥ अग्नीसींनेणेइंधन ॥ त्याचेंकरितामंथन॥
प्रगटेआपणअग्नीतो ॥ ९० ॥ ज्याकाष्ठींप्रगटलापावक ॥ त्याकाष्ठातेंजाळोनकरी
राख॥तैसेंब्रम्हज्ञानेंहोयेदेख॥नर्कातर्कजळालेती ॥९१॥तैसेंगुरुज्ञानेंकरीतांशब्दमंथ
न॥तेथेंअनुर्वाच्यप्रगटेहुताशन॥तेणेंशब्दब्रम्हातेंजाळोन॥झालाआपणनाहींच ॥९२
जोंवरीकाष्ठासींकाष्ठपण ॥ तोंवरीचअग्नीआपण ॥ काष्ठनी:शेषजातांजळोन ॥ जाय
विझोनआपणही॥९३॥तैसाजोंवरीआहेदेहाभिमान ॥ तोंवरीचशब्दब्रम्हाचेंभान ॥
उठतांचीदेहाचेंठाण ॥ शब्दजाणनि:शब्दहोये ॥ ९४ ॥ जोंवरीशब्दनि:शब्दझा
लानाहीं ॥ तोंवरीज्ञानतेंचिअज्ञानपाहीं ॥ जैसेवेडेस्मरणकरीतांकांहीं ॥ परिनाहीं

१ अर्थाचा क्रम २ विद्वानास ३ आभाळांत ४ लांकडें ५ विस्तव ६ आत्म ज्ञान ७ अमी ८ सर्व

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

भावभक्ती ॥ १५ ॥ आर्थीआत्मत्वाचेंविस्मरण ॥ तोचिभूतसंचारनाण ॥ त्यावरी
विद्याभिमानाचेंमद्यपान ॥ मगशब्दब्रम्हआपणजल्पत ॥ १६ ॥ तरीत्याचेंजेंजेंज
ल्पण ॥ तेंतेंअविद्याचिमिथ्याजाण ॥ ऐसेंजाणोनीआपण ॥ सहजहोवोनराहेंरे ॥
॥ १७ ॥ तरीब्रम्हपूर्वीसहजचिआहे ॥ त्यामाजीहेंसहजचिहोये ॥ तूंहेंसहजचिपाहे ॥
सांडीसोयद्वैताची ॥ १८ ॥ सहजसांडोसायासकरिती ॥ तरितूंआपणाआपणवं
चिसी ॥ ऐसेंजाणोनियांसहजासीं ॥ कल्पांतेसींसांडोनको ॥ १९ ॥ सहजायेवढें
सुख ॥ नाहींनाहींगादेख ॥ सायासासारिखेंदुःख ॥ पाहतांत्रैलोक्यींनदिसेचि ॥
॥ २०० ॥ पुढिल्यासीजाणोंजाईजे ॥ तरिजाणत्यासीअंतरीजे ॥ म्हणवोनजाणें
सांडोनसहजे ॥ राहतांचिलाहींसुखातें ॥ १ ॥ ब्रम्हस्वतःसिद्धशाश्वत ॥ सहजचि
सहजप्रकाशत ॥ तुझासाडोनियांआतांहेत ॥ सहजस्थितिसाधींरे ॥ २ ॥ जेव्हांम
नबुद्ध्यादिकातेंनिरशिलें ॥ तेव्हांजाणणेंसहजचिगेलें ॥ जैसेंसूर्यजातांमावळे ॥ कि
रणेगेलींहरपोनी ॥ ३ ॥ जेव्हाकिरणचिहरपलें ॥ तेव्हांमृगजळचिनाहींझालें ॥
तैसेंमनादिकत्यागितांसर्वगेलें ॥ अविनाशउरलेंसहजेंची ॥ ४ ॥ तरीतूंसहजजाणो
न ॥ सांडीकल्पनेचेंभान ॥ राहेसहजचिहोवोन ॥ अध्यायझालापूर्णयेथोनी ॥ ५ ॥ ॥ १ ॥
सदाचिदआनंद ॥ बुडालात्रिपुटीचाभेद ॥ त्वंपदआणितत्पद ॥ उडालींशुद्धअसी

१ बोलत २ माया ३ व्यर्थ ४ सिळवें ५ मावळें ६ अंतराहीं असें नव्ह.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पदासीं ॥ ६ ॥ सद्रुपजेंसंचलें ॥ तेंत्वांसाक्षित्वेंजाणितलें ॥ चित्जेंचिद्रुपाआलें ॥
तेंप्रकाशिलेतुझेनी ॥ ७ ॥ सदाचिदाचिजेऐक्यता ॥ त्याआनंदाचातूंजाणता ॥ हें
सहजींसहजचिसुता ॥ नकरिताहेतअसे ॥ ८ ॥ ध्येयध्यानआणिध्याता ॥ तूंयाति
घातेंजाणता ॥ ज्ञेयज्ञानआणिज्ञाता ॥ तुंप्रकाशितासर्वांचा ॥ ९ ॥ म्हणोनजाणोन
नेणताहोइजे ॥ जैसेंस्वप्नातेंविसरीजे ॥ तैसेंजाणोनिसहजींसहजे ॥ आपणराहि
जेनिश्चयीं ॥ २१० ॥ ऐसेंऐकोनिवचन ॥ बोलेरत्नाकरकरजोडोन ॥ सांगासहजा
चिखुण ॥ कृपाकरोनीदयाळा ॥ २११ ॥ सहजसहजापासोन ॥ होतअसेनिर्माण ॥
ऐसेंस्वामीबोलिलेवचन ॥ तेंलवकरोनीसांगावें ॥ २१२ ॥ अध्यायपूर्णझालायेथो
नी ॥ पुढेंबैससावधहोवोनी ॥ सांगेनपुढिलकथनीं ॥ तुझीआळमीपुरवीन ॥ १३ ॥
आठवाअध्यायपूर्णझाला ॥ आतांनववाआरंभिला ॥ रामानंदम्हणेरत्नाकराला ॥
चित्तकथेलादेईबापा ॥ २१४ ॥ याअध्यायींहेंचिकाथिलें ॥ कारणमहाकारणनिरसि
लें ॥ आत्मस्थितीससांगीतलें ॥ वस्तुएकलीएकत्वें ॥ २१५ ॥ चौंदेहाचेंबंधन ॥
भ्रमेंचिपडलेंहोतेंजाण ॥ त्याभ्रमाचेंकरोनहवन ॥ ब्रम्हपूर्णकेलेंतें ॥ २१६ ॥ पहि
ल्याअध्यायापासोन ॥ तिसरेअध्यायाचेंअवसान ॥ बोधकेलाचिशब्देंकरून ॥ परी
मानोनीपाहिलें ॥ २१७ ॥ अनुभवोनिपाहिलेंजवे ॥ तोअवधानेंगिळिलेंसर्व ॥ श

१ चैतन्य रूप २ एकी ३ या नांवाचे देह ४ निरसन केलें

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ब्दब्रम्हाच्यावैभवें ॥ सैन्यठावपुसिला ॥ २१८ ॥ शब्दब्रम्हापासोन ॥ पुसलीअनु
वाच्याचीखूण ॥ तोचौथ्याअध्यायींजाण ॥ अनुभवपूर्णसांगीतला ॥ २१९ ॥ जो
अनुभवहोताप्राप्त॥ ज्ञानदृष्टीप्रकाशत ॥ अनेकींएकचिभासत ॥ झालाअंतहेतूचा ॥
॥ २० ॥ हेतूचानिर्हेतुझाला ॥ देहींचब्रम्हत्वाआला ॥ तोबोधचौथियमाजिझाला ॥
तेणेंहरपलासंदेह ॥ २२१ ॥ पांचव्यापासोनआठव्यापर्यंतजाण ॥ केलेंब्रम्हांडाचेंनि
रसन ॥ सर्वबंधनातेंतोडोन ॥ साक्षिपूर्णकेलासे ॥ २२२ ॥ तेंसाक्षित्वआपुलेंजा
णोन ॥ राहावेंसहजींसहजहोवोन ॥ तेंपुढिलेअध्यायींसांगेन ॥ बोलेखूणरामानंद
॥ २२३ ॥ हादीपरत्नाकरग्रंथ ॥ एथेंमीतूंपणाहोयअंत ॥ ब्रम्हभासेसदोदित ॥ ऐ
सीस्थितीयाग्रंथाची ॥ २२४ ॥ याग्रंथाचेंकरितांपठण ॥ आपलेंआपणाहोयदर्श
न ॥ पिंडब्रम्हातेंनिरसोन ॥ ब्रम्हपूर्णहोयतें ॥ २२५ ॥ याग्रंथाचेंलाघवऐसें ॥ स्व
येंचिजीवब्रम्हदिसे ॥ मीतूंपणाचेंमूळनासे ॥ आत्माभासेप्रकाशरूप ॥ २२६ ॥ चि
द्धानंदाचेनिप्रसादें ॥ रामानंदबोलेपदें ॥ रत्नाकराचेनिसंवादें ॥ ग्रंथविनोदेंचालि
ला ॥ २२७ ॥ इतिश्रीचिदादित्यप्रकाशेदीपरत्नाकरग्रंथेसर्वनिरसनयोगोनामअ
ष्टमोध्यायः ॥ ८ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ एकंदर ओव्या ॥ २२७ ॥ छ ॥

१ ऐश्वर्यानें २ ब्रह्म.ची ३ संऽय ४ मांडणें, नाश ५ लीला कथ

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ ॥ जयजयस्वामीसद्गुरु ॥ तूंपूर्णामृतपूर्णसागरु ॥ तुझानक
ळेकोणापारू ॥ तूंअपारूआससी ॥ १ ॥ तूंसर्वांचीआदी ॥ आदिमध्यअवसान
तुजमधीं ॥ जैसेतरंगअसतीसरवर्स्वींउदधीं ॥ परीतरंगाशुद्धीनसेची ॥ २ ॥ तरंग
सागराचेअंश ॥ परितरंगनेणतीसागरास ॥ तैसींमनबुद्ध्यादिकेंसर्वस्व ॥ तुझाभा
सनसेत्यां ॥ ३ ॥ तरंगउठोनसागरींक्रीडत ॥ सागरनिश्चळपरितेचंचळदिसत ॥
तैसीमनादिकांचीस्थिती ॥ सत्तेंवर्ततलतुझिया ॥ ४ ॥ तुझ्यासत्तेंमनामनपण ॥ परी
मनासींनाहींतुझेंज्ञान ॥ जैसेतरंगसागराप्रमाण ॥ नेणतीजाणकल्पांतीं ॥ ५ ॥
जैसेतरंगसागरानेणती ॥ परीविसरोनीसागरचिहोती ॥ तैसातूंमनाचेअंतीं ॥
सहजचीसंचलाशी ॥ ६ ॥ मनहोतांअमन ॥ तूंस्वतःसिद्धपूर्ण ॥ तूंउलटाचिसु
लटाजाण ॥ म्हणवूनखूणनकळेचि ॥ ७ ॥ आपणाकांहींचनहोइजे ॥ तेव्हांचितूं
तेंलाहिजे ॥ ऐसेंवर्मआहेतुझें ॥ तेंनेणिजेकांहींकेल्या ॥ ८ ॥ तुझेकृपेविण ॥ तुझें
नकळेमहिमान ॥ ऐसीमजकळोनीआलीखूण ॥ तूंआदिअवसानसर्वांचा ॥ ९ ॥
मनाचेआदितूंआहेसी ॥ मनाचेअंतीतूंलाहिजेसी ॥ म्हणोनसांडोनमनपणासीं ॥
शरणतुजसींकृपाळुवा ॥ १० ॥ आतांहेचिमाझीविनवणी ॥ सांगासहजाचीमां
डणी ॥ सहजवोळखावेंकैसेंनी ॥ तेंउकलोनीसांगावें ॥ ११ ॥ मागिलेअध्यायीं

१ अमृतानें पूर्णभरलेला समुद्र २ अनंत

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आपण ॥ मजदिधलेंअभयदान ॥ कींपुढेंसहजाचीखूण ॥ तुजलागोनसांगेनरे ॥
॥ १२ ॥ तेंकृपाकरोनआतां ॥ मजसांगावेंसद्गुरुनाथा ॥ जेणेंसहजबाणेचित्ता ॥
तेंचिताताकरावें ॥ १३ ॥ मजब्रम्हबोधपूर्णझाला ॥ सहजराहेंऐसेंमजला ॥ कृपा
वलोकनेंपाहिजेकेला ॥ उपदेशमज ॥ १४ ॥ तरींसहजतेंकैसें ॥ म्यांजाणावेंमान
सें ॥ शरीरक्रीडासहवासें ॥ कैशाजाणकरा॰या ॥ १५ ॥ ऐसेंऐकोनियांवचन ॥
बोलिलेगुरुचकोरजीवन ॥ रत्नाकरातुजदेखोन ॥ माझेंमनआनंदलें ॥ १६ ॥
जेंसर्वांसींचोरलेंहोतेंगुज ॥ तेंम्यांसांगीतलेंतुज ॥ कांजेतुजप्रसन्नज्ञानराज ॥
म्हणोनीमजचोरवेना ॥ १७ ॥ गुह्याचेंगुह्यसांगीतलें ॥ आतांकांहींनाहींउरलें ॥
मनबुद्धयादिकाचेंमावळलें ॥ शरीरराहिलेंनिर्विकार ॥ १८ ॥ तेंसहजीसहज
राहावें ॥ प्रारब्धाआधीनलावावें ॥ जेंजेंहोईलस्वभावें ॥ तेंतेंजावेंभोगित ॥ १९ ॥
जैसेंदेंटींचेंपानसुटलें ॥ तेंवायूवेआधीनझालें ॥ जिकडेजिकडेवायूनेंनेलें ॥ ति
कडेगेलेंसहजची ॥ २० ॥ तैसेंकल्पनादेंटींचेंसुटोन ॥ शरीरकरावेंप्रारब्धाधीन ॥
आपणकरावेंभजन ॥ प्रयत्नेंकरूनीश्रीकृष्णाचें ॥ २१ ॥ तूंम्हणसीप्रारब्धाधीन ॥
भक्तीहीहोईलप्रारब्धेंकरून ॥ आपणकासयाकरावेंप्रयत्न ॥ ऐसेंअनुमानकरिसी ॥ १ ॥
॥ २२ ॥ तरीशरीरभोगतोप्रारब्धाधीन॥ सुखदुःखहोयप्रयत्नेंवीण ॥ म्हणोनीशरी

१ उपदेश, ज्ञान २ एकपक्षी ३ उदक ४ गुप्तगोष्ट

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रभोगआपण ॥ सहजकरूनभोगिजे ॥ २३ ॥ भक्तिकेल्याविना ॥ नहोयसत्यजा
णा ॥ सुखदुःखनाना ॥ प्रयत्नेंवीणहोतील ॥ २४ ॥ म्हणोनीशरीरभोगासीं ॥ तूंप्र
यत्नकरीसहसी ॥ हरिभक्तीआदरेसीं ॥ अतिहर्षेंकरावी ॥ २५ ॥ करितांहरिभज
नासीं ॥ मध्येंचउठलेविवंसी ॥ मेळवितांअशनवसनासीं ॥ होयभजनासींअंतरायें
॥ २६ ॥ कांजेविषयींरतझालेती ॥ शरीरभोगातेंइच्छिती ॥ आपलेसाक्षित्वानेण
ती ॥ म्हणोनकरितीप्रयत्नातें ॥ २७ ॥ ज्यासींअनुभवाचेंनाहींज्ञान ॥ तोचिम्हणे
मीशरिरींआपण ॥ मगयाचेंकरावयापालन ॥ नानाप्रयत्नकरीत ॥ २८ ॥ ज्यासीं
आपुलेंनाहींज्ञान ॥ तोकायजाणेसहजाचीखूण ॥ व्हावेंप्रारब्धाआधीन ॥ हेचि
खुणसहजाची ॥ २९ ॥ देहआजीचजावो ॥ अथवाचिरंजीवराहो ॥ परियाचाकां
हींनसावामोहो ॥ वोळंगावादेवआवडी ॥ ३० ॥ जेंजेंहोईलज्यावेळें ॥ तेंभोगावेंप्रा
रब्धबळें ॥ प्रयत्नसांडूनप्रेमबळें ॥ मानीवेगळेंआपणासीं ॥ ३१ ॥ तरिहेंसृष्टीत्रिगु
णाआधीन ॥ गुणयोगेंचालेजाण ॥ शुभाशुभकर्मेंअजाणून॥ गुणेंकरूनहोतअसती
॥ ३२ ॥ जेंकांहींमजपासूनहोयतें ॥ ऐसेंतूंनकोम्हणूंआपणातें ॥ जैसेंचुंबकचालवी
लोंहातें ॥ तेंसांगनुसतेंतुझेनी ॥ ३३ ॥ जैसेंचुंबकलोहाचालोंगेलानाहीं ॥ परीसं
न्निधानेचालेपाहीं ॥ तैसेंआत्मसत्तेनेंसर्वही ॥ संदेहकांहींधरूनको ॥ ३४ ॥ अहंभो

१ गैरसावधपण। २ अन्नवस्त्र ३ अडथळा। ४ मनाचा ५ सत्वरजतम ६ चांगलीं वाईट कर्मे ७ लोखंडाला ८ जवळपणा।

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

क्ताअहंकर्ता ॥ ऐसिजरीमानसीचिंता ॥ कांजेमीसर्वांचालता ॥ ऐसीअहंताकरसी
ल ॥ ३५ ॥ आत्मागुणानेंचालवीतहोता ॥ तरीतोसुखदुःखातेंभोगिता ॥ आत्मस
तेंगुणासींगुणता ॥ सहजसुताहोतसे ॥ ३६ ॥ जैसाचुंबकासींहाहेतनाहीं ॥ माझ्या
सतेनेंचालेलोखंडपाहीं ॥ तैसेंआत्म्यासींगुणकांहीं ॥ भावनाहींसर्वथापैं ॥
॥ ३७ ॥ जैसेंगृहकर्मासींदीपक ॥ प्रकाशनवेगळाचदेख ॥ त्याचेतेजेंवर्त
तीएकमेक ॥ नसेशोकत्याकर्माचा ॥ ३८ ॥ एकयेतीएकजाती ॥ एकजेवितीएक
वाचिती ॥ एकचोरीकरिती ॥ परीदीपजोतीनेणेची ॥ ३९ ॥ दीपावेगळेंका
हींझालेंनाहीं ॥ परीदीपनेणेंतोविसोई ॥ तैसीआत्मसत्तेंगुणपाहीं ॥ कर्मेंदेहींदिस
ती ॥ ४० ॥ शुभाशुभकर्मेंहोती ॥ तेगुणयोगेंजाणचित्तीं ॥ म्हणोनीनिंदाआणि
स्तुती ॥ सांडूनभक्तीकरावी ॥ ४१ ॥ उत्तमकर्मसत्वगुणापासोन ॥ मध्यमहेंरजोगु
णें ॥ कनिष्टतेंतमोगुणें ॥ आत्माजाणप्रकाशक ॥ ४२ ॥ जेगुणचेष्टेतेंनेणती ॥ तेचि
निंदास्तुतीवरपडहोती ॥ जेंगुणकर्मातेंजाणती ॥ तेत्यागितीअभिमान ॥ ४३ ॥ श
रीरजडअचेतन ॥ त्याचीचेष्टागुणाधीन ॥ ऐसेंजाणोनसाधुजन ॥ विकारभानसां
डिती ॥ ४४ ॥ जैसेंमृगजळाचेपुरेंकरून ॥ नलोटतीगिरिवरजाण ॥ तैसेंगुणाचेवि ॥ २ ॥
कारेंआपण ॥ साधुजननगजबजती ॥ ४५ ॥ कांजेंवस्तुगुणातीतआहे ॥ तोगुणक

---

१ मी करणारा २ अभिमान ३ गुणानुसार ४ मोद पावत.

CC-0 Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मीसींलिप्तनोहे ॥ तेवस्तुमीचिस्वयें ॥ म्हणूनराहेंनिर्विकल्प ॥ ४६ ॥ जैसेवायूचेझ
डाडें ॥ आकाशातेंनउडे ॥ तैसेंत्रिगुणाचेगडबडे ॥ साधुनअडेदेहसंगें ॥ ४७ ॥ आ
काशामाजीयेतांधुंई ॥ परीआकाशनमाखेकांहीं ॥ तैसीदेहाचीहेसोई॥साधुपाहींलि
पेना ॥ ४८ ॥ जैसेजगाचेउपद्रवेंकरून ॥ पृथ्वीगादीनाआपण ॥ तैसेंगुणाचेयोगें
करून ॥ साधुचेंमनडळमळीना ॥ ४९ ॥ जेसद्गुरूचेअंकिले ॥ज्यांहींआपणाजाणित
लें ॥ तेचिगुणकर्मातितझाले ॥ म्हणऊनराहिलेसाक्षिरूप ॥ ५० ॥ जोमुक्तझाला
आपण ॥ त्यासींमुक्तभासेसर्वजन ॥ कांजेतोत्रिगुणातीतम्हणोन ॥ भावीभगवान
सर्वत्रीं ॥ ५१ ॥ ज्यासींसर्वत्रींभासलेंएक ॥ तोचिमीतूंसीझालाविन्मुख ॥ जैसेंजागृ
तींस्वप्नदेख ॥ गेलेंनिःशेषहरपोनी ॥ ५२ ॥ जोंवरीनिःसंगताजोडिलीनाहीं ॥ तों
वरीसहजसहजाचीनकळेसोई ॥ आणिसहजाविणपाहीं ॥ सुखकांहींदिसेना ॥
॥ ५३ ॥ त्वांपुसिलीसहजाचीखुण ॥ तीम्यांसांगितलीआपण ॥ तरीतूंसहज
होवोन ॥ करीभजनअद्वैत ॥ ५४ ॥ आकारस्थितीसहजजाणोन ॥ तूंराहेंनि
र्विकल्पहोवोन ॥ सर्वहीमीचम्हणवोन ॥ करीभजनएकत्वें ॥ ५५ ॥ सर्वइंद्रि
यातेंवळून ॥ साठवीमनातेंआणून ॥ तेंमनगगनामाजीलीन ॥ अनुभवेंकरून
करावें ॥ ५६ ॥ त्यागगनातेंगिळून ॥ असावेंअवकाशरूपहोवोन ॥ तेव्हांचि

---

१ धूर २ सत्व, रज, तम या तिन्ही गुणांहून निराळा ३ सर्वठिकाणीं ४ मीतूंपणा

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आंतुडेसहजाचीखुण ॥ सत्यजाणरत्नाकरा ॥ ५७ ॥ तूंहेआपमामाजीजाणो न ॥ जायआपणासींविरोन ॥ द्दश्यंद्रष्टानारायण ॥ मीपणतेंवावची ॥ ५८ ॥ मी पणसांडूनभक्तीकरणें ॥ तेअव्यभिचारिणीभक्तीम्हणणें ॥ मीपणधरूनजेवर्तणें ॥ तो चिजाणव्यभिचार ॥ ५९ ॥ कांजेसर्वत्रींएकआहे ॥ जैसेंतैसेंचीभासताहे ॥ भास व्यापासोनअतीतराहे ॥ भासविताहेआपण ॥ ६० ॥ जेंजाणत्यासींजाणतें ॥जाणो ननाहींचहोतें ॥ नाहींपणाचीजेंआइते ॥ तेंसर्वांतेंप्रकाशी ॥ ६१ ॥ जेंसर्वंप्रकाशिलें एकमेकांतेंजाणविलें ॥ भेददावोनसंचलें ॥ एकींएकलेंएकत्व ॥ ६२ ॥ त्याएकत्वीं मीपण ॥ तेंचिव्यभिचारभक्तिजाण ॥ मजसकटहाभगवान ॥ तोचिजाणअव्यभि चार ॥ ६३ ॥ आब्रम्हेस्तंभपर्यंत ॥ एकव्यापकविश्वनाथ ॥ जैसाउभाआडवातंत ॥ पटींदिसतपाहतां ॥ ६४ ॥ उभाआडवातंतुएक ॥ तैसाविश्वींविश्वनायक ॥ ऐसेंजा णोनीभक्तिकरीदेख ॥ तेचिवोळखअव्यभिचारु ॥ ६५ ॥ अव्यभिचारीभक्तिकरि तां ॥ संतोषहोयविश्वनाथा ॥ म्हणोनरत्नाकराआतां ॥ भक्तिपंथालागावें ॥ ६६ ॥ ऐसेंसद्गुरुवाक्यऐकोनी ॥ बोलेरत्नाकरकरजोडोनी ॥ स्वामीमजअनाथजाणोनी॥ विनवणीएकऐकावी ॥६७॥ ऐकाऐसेंजरिम्हणावें ॥ तरीतुम्हांनायकणेंदेखावें ॥ ऐक णेंनायिकण्याचीसाक्षीव्हावें ॥ तेव्हांस्वभावेंतूंचितूं ॥ ६८ ॥ ऐसियातुझेंकरितांस्त

१ तुटे २ दिसणारें नग ३ भगवा[illegible] ४ [illegible] ५ [illegible] तृणापर्यंत.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वन ॥ तरितेंस्तवनतुझेसत्तेकरून ॥ परितूंस्तवातीतआपण ॥ स्तवनींस्तवनातेंजा
णप्रकाशसी ॥ ६९ ॥ तुझ्याप्रकाशींसर्वप्रकाशिलें ॥ तेथेंमाझेंमीपणकोठेंउरलें ॥
आतांभक्तिकराम्हणितलें ॥ हेंवाटलेंनवलकीं ॥ ७० ॥ आधींमाझामजलाचिठाव
नाहीं ॥ मींभासतोंमिथ्यापरिपाहीं ॥ जैसेंमृगजळभासोनकांहीं ॥ सत्यनाहींनिश्च
यें ॥ ७१ ॥ तैसेंदेहसंगेंकोण ॥ माझ्याठायींजेंमीपण ॥ जैसेंउखरासंगेंकिरणींजा
ण ॥ होयभानमृगजळाचें ॥ ७२ ॥ जैसेंउखरसंगेंकरून ॥ पाहत्यासींभासेमृगजळ
भान ॥ तैसेंदेहसंगेंजाण ॥ उठेमीपणनसतेंची ॥ ७३ ॥ त्यामीपणेंकरून ॥ अज्ञान
होयदेहाभिमान ॥ त्यादेहाभिमानेंकरून ॥ द्वैतजाणभासत ॥ ७४ ॥ तेंअज्ञानज्ञान
झालें ॥ तेथेंद्वैतसहजेंगेलें ॥ मीतूंपणाविणउरलें ॥ एकत्वींएकलेंप्रकाशरूप ॥
॥ ७५ ॥ आतांद्वैतासींठावनाहीं ॥ तेथेंकरावेंकोणाचेंकाई ॥ हेंउकलोनिस्वामिहीं॥
सांगावीसोयहिताची ॥ ७६ ॥ तुम्हींपूर्वीजेंसांगीतलें ॥ तेंम्यांमनींधरिलें ॥
आतांजेंनिरोपिलें ॥ तेंवहिलेंसांगावें ॥ ७७ ॥ माझ्याठाईंतेंकांहीं ॥ कर्तृत्वा
चेंउरलेंनाहीं ॥ आज्ञाकेलीस्वामीहीं ॥ जेभक्तीसोयधरावी ॥ ७८ ॥ तें
भक्तीलक्षण ॥ स्वामीसांगावेंविवरोन ॥ तंवबोलिलेसद्गुरुआपण ॥ भलाम्ह
णोनअश्वासिला ॥ ७९ ॥ तुझेमनीचीभावना ॥ मजकळोंआलीजाण ॥ जे

१ वेगळें करून २ आश्वा नादिलें

CC-0.Jangamwadi Math Collection, Digitized by eGangotri

थेंठावनाहींमीतूंपणा ॥ तेथेंकोणेकोणाभजावें ॥ ८० ॥ जरीमुळींचेंआहेपाहावें ॥
तरीऐसेंचआहेस्वभावें ॥ तरीवेदमर्यादितेंपाळावें ॥ म्हणोनकरावेंभक्तीतें ॥ ८१ ॥
शिवोंनभूत्वाशिवंजयति ॥ ऐशीबोलतआहेश्रुति ॥ म्हणोनटाकितांदेहाभिमाना
प्रती ॥ ब्रम्हस्थितीबाणेली ॥ ८२ ॥ स्वतांजोब्रम्हहोईल ॥ तोचिव्यापकब्रम्हतेजा
रमेल ॥ देहाभिमानजोकरील ॥ त्यांसीहोईलकष्टची ॥८३ ॥ चौदेहातेंनिरसोन ॥
मनबुद्दयादिकांतेंत्यागोन ॥ जोराहिलासाक्षिहोवोन ॥ तोचिआपणब्रम्हझाला ॥
॥ ८४ ॥ तोअनुभवेंब्रम्हझाला ॥ परीदेहआहेउरला ॥ म्हणऊनीदेहसंगेंभक्तीला ॥
साधीवहिलालागवेगें ॥ ८५ ॥ अरेब्रम्हत्वारितआयतेंचिआहे ॥ आदिअवसानींसं
चलेंपाहें ॥ हेंहोतांनवलकाय ॥ परिभक्तीआहेकठीण ॥ ८६ ॥ ब्रम्हहोऊनआपण॥
शरिरींदावावेंभक्तिचिन्ह ॥ कांजेंशरीरअपवित्रम्हणोन ॥ यासीभूषणभक्तीचें ॥८७॥
अरेतूंमुळींचाब्रम्हआहेसी ॥ परीशरीरअपवित्रपापाचीराशी ॥ भक्तीकेल्यानेंपवि
त्रतात्यासी ॥ तूंसाक्षित्वेंसीराहीरे ॥ ८८ ॥ त्वांआपुलेंसाक्षित्वजाणीतलें ॥ तरी
कायदेहाचेंकर्मराहिलें ॥ मनाचेंमनपणगेलें ॥ कींबुडालेतर्कातर्क ॥ ८९ ॥ कांनेत्रीं
चेंपाहणें ॥ मुखाचेंबोलणें ॥ जिव्हेनेंरसघेणें ॥ गळेठाणेंस्वप्नाचें ॥ ९० ॥ जागृती ॥ ४ ॥
अवस्थाबुडाली ॥ प्राणाचीरिंगनिघीराहिली ॥ बुद्धीबुद्धीसींभुलली ॥ अहंकारस

१ आपण शिव रमात्माहोऊन ब्रम्हझाला जिंकितो २ माघली ३ शरीरदेह ४ सत्वर ५ प्रारंभापासून ६ येगें जाणें

CC-0.JangamWadi Math Collection. Digitized by eGangotri

मुळींगेलाकाय ॥ ९१ ॥ सुषुप्तीचेंउडालेंठाणें ॥ तुर्याचेंउडालेंजाण ॥ गेलेकायतेवि
चारून ॥ मगनकरणेंभक्तीसीं ॥ ९२ ॥ जरियामाजीकांहींअसेल ॥ तरीभक्तीकरि
तांसुटतील ॥ हेंगुह्यअतिसखोल ॥ वेचितांमोलनकळेची ॥ ९३ ॥ जेपुर्णानुभवींअस
तील ॥ तेयासुखासेंजाणतील ॥ खंडज्ञानीहंसतील ॥ म्हणतीलतेऐका ॥९४॥ आम्हां
ससद्गुरूचेकृपेविण ॥ पूर्णझालेंब्रम्हज्ञान ॥ भेदाभेदगेलाजाण ॥ कर्मकोणकाज
काय ॥ ९५ ॥ जेंविधिनिषेधेंवागविती ॥ तेचिकर्माकर्मीगुंतती ॥ आम्हांतुष्टलाश्री
पती ॥ लाधलीस्थितीवामांची ॥ ९६ ॥ वाममार्गाचेंज्ञान ॥ तेंप्राप्तभाग्येंकरून ॥
चारहेंविर्णएकाचिजाण ॥ भेदभाननसेचकीं ॥ ९७ ॥ जेथेंइंद्रियेंतृप्तनव्हती ॥ ज्ञान
नव्हेतेंभजती ॥ मद्यमांसादिभक्षिती ॥ इतरांम्हणतीकंटकहें ॥ ९८ ॥ वर्णावर्णदेती
सोडून ॥ नित्यनैमित्याचेंबोळवण ॥ करितातीविषयसेवन ॥ तेणेंचिकरूनसंतोष
ती ॥ ९९ ॥ ज्यांसींआत्मानुभवनाहीं ॥ तेयाअज्ञानींरतपाहीं ॥ ज्यासींत्याचीशुद्धी
नाहीं ॥ साचेंकांहींहितते ॥ १०० ॥ तेअनहितचिकरिती ॥ परिहितमानोनिघेती॥
ऐसेभुललेमंदमती ॥ तेबोलतीअव्हसव्ह ॥ १ ॥ सांडूनियांकल्पतरू ॥ करितिशेरा
चाआदरू ॥ तैसेसांडूननिर्विकारू ॥ विकारींआदरकरीती ॥ २ ॥ तुळसीचेंझाड
उपडून ॥ करिभांगेचेंरोपण ॥ तैसेंव्यापकातेंसांडून ॥ होतीजाणएकदेशी ॥ ३ ॥

१ अज्ञानी २ कल्पकरणें ३ नकरणें ४ कुमार्ग ५ चारजाती ६ वेडेवाकडें

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कामधेनुहाकूनबाहेरवातली ॥ आणिआदरेंगाढवेंपाळी ॥ तैसीवाममार्गीरतताझा
ली ॥ आत्मत्वोंपडलीभुलीत्यांसीं ॥ ४ ॥ परिसातेंसांडोन ॥ आदरेंघेतीपाषा
ण ॥ तैसेंआत्मत्वातेंनेणोन ॥ करीपूजनदेवीदेवतेचें ॥ ५ ॥ राज्यटाकूनिमजूरी ॥
जैसाराजाबळेंचिकरी ॥ तैसेंपूर्णत्वसांडोनीदूरी ॥ देवतातरीभजतससे ॥ ६ ॥
अमृतसांडूनकांजीप्याला ॥ तैसाप्रसंगदिसेघडला ॥ हादेहमीम्हणवूनीमानि
ला ॥ हावेंभरलाम्हणवूनी ॥ ७ ॥ शिवंभूत्वाशिवंजयती ॥ त्याचीतोंनकळेचिस्थि
ती ॥ मगदेहबुद्धीनेंवर्तती ॥ इतरांनिंदितीमहामूर्ख ॥ ८ ॥ एकअद्वैतभक्तिविण ॥
जेंजेंकीजेतेंविटंबनजाण॥ म्हणोनीपाखंडातेंसांडून ॥ करींभजनरत्नाकरा ॥९॥ कां
जेंशरीरजोंवरीआहे ॥ तोंवरीतेणेंकरावेंकाये ॥ मनबुद्ध्यादिकांलाविजेसोय ॥ जेहो
यनिर्विकार ॥ १० ॥ जोंवरीशरीराचेंअधिष्ठान ॥ तोंवरीमनबुद्यादिकजाण ॥ म्हणो
नत्यासींभक्तीचेंअनुसंधान ॥ साक्षेपेंकरूनिलावावें ॥ ११ ॥ तुजमनासींकांहीं ॥
संबंधमुळींहूननाहीं ॥ परिमनतुझेठायीं ॥ म्हणोनीसोईलावावें ॥ १२ ॥ मनेंकीजे
आत्ममनन ॥ मुखेंकीजेअद्वैतस्मरण ॥ नित्यनैमित्यआदरेंकरून ॥ करावेंआपणवे
दाज्ञें ॥१३॥ जैसेसागराचेकल्लोळेंसागरींक्रीडती ॥ परितेसागररूपचिहोती ॥ तैसी
करावीभक्ती ॥ अद्वैतस्थितीजाणोन ॥१४॥ जोंवरीअद्वैतस्थितीजाणलीनाहीं ॥ तों

१ समुद्राच्या २ लाटा

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वरीभक्तीनोहेकांहीं ॥ ऐसेंजाणोनीसोई ॥ लवलाहींधरावी ॥१५॥ पूर्वींब्रम्हज्ञानी झालेती ॥ त्यांहींकेलीअद्वैतभक्ती ॥ वेदमर्यादातेपाळिती॥जनादावितीआचरोनी॥ ॥१६॥ श्रेष्ठजरीनदावितीआचरून ॥ तरीजनासीमार्गलागेलकोठूनी ॥ म्हणोनी जनउद्धरास्तवजाण ॥ करावेंभजनअहर्निशीं ॥ १७ ॥ सर्वआपणामाजीजाणिजे॥ सर्वआपणचिहोइजे ॥ निःसंदेहकीर्तनकीजे ॥ सर्वसांडिजेसंदेहातें ॥ १८ ॥ भक्ति ज्ञानवैराग्य ॥ अहोहेंआत्मानुभवाचेंभाग्य ॥ जेणेंसंतुष्टश्रीरंग ॥ तैसेंभाग्यशरीरा चें ॥ १९ ॥ हात्रिवेणीओघपाहीं ॥ असेज्यानराच्याठायीं ॥ त्याच्याभाग्यासींपार नाहीं ॥ नरदेहींतोचिधन्य ॥ २० ॥ भक्तिम्हणजेकाई ॥ जेथेंद्वैतभावनाहीं ॥ अनेक दिसतांपाही ॥ एकत्वसोईचुकेना ॥ २१ ॥ जगदिसेआनन ॥ परिभावनोहेभिन्नभि न्न ॥ जैसेंनगअसतांसुवर्ण ॥ असेव्यापुनसर्वांतें ॥ २२ ॥ जेंजेंत्यासींभेटेभूत ॥ तेंमा निजेभगवंत ॥ नानाघटींएकभूत ॥ असेदिसतजेवीं ॥ २३ ॥ जैसेसाखरेचेरवेआणो न ॥ परिगोडीनव्हेभिन्न ॥ कींगारतेंचिनीरंजाण ॥ भूतींभगवान्तैसाअसे ॥ २४ ॥ परळमाथणरांजण ॥ घडेगाडगींअगण्य ॥ परीमृत्तिकानोहेभिन्न ॥ तैसाभगवान्स र्वत्रीं ॥ २५ ॥ सर्वभूतएकजाणून ॥ निंदास्तुतीसांडून ॥ शरीरलावीभक्तीआधीन ॥ ज्ञानीजाणतोएक ॥ २६ ॥ ब्रम्हस्थितीबाणलीअंतरीं ॥ तीदाखवावीशरीरीं ॥ द्वैता

---

१ उदक २ मणिमात्र

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

द्वैतसांडूनी ॥ नित्यकरीनामघोष ॥ २७ ॥ जैसेंब्रम्हसर्वत्रींव्यापकआहे ॥ तैसेंप्रका
शिलेंपाहें ॥ तेसातुंशरीरेंकरूनहोय ॥ घरींसोयभक्तीची ॥ २८ ॥ श्रीगुरूकृपेंब्रम्हा
नुभवझाला ॥ तेणेंद्वैतभावअवघाचिगेला ॥ परीशरीरआहेतोंवेदमर्यादेला ॥ पाळी
वहिलालागवेगें ॥ २९ ॥ वेदाचीआज्ञापाळणें ॥ हेचिदेवाचीभक्तीम्हणें ॥ देवाशींअ
वतारलागलाघेणें ॥ वेदस्थापनेंस्तव ॥ ३० ॥ जेवेदाचेअनुसंघानेंचालती ॥ त्यांसी
रक्षिताश्रीपती ॥ जेवेदाचीआज्ञामोडिती ॥ तेजातीनरकालया ॥ ३१ ॥ अहं
ब्रम्हास्मिऐसें ॥ वेदबोधकरीतसे ॥ सांडोनद्वैतपिसें ॥ पाहासौरसेंएकची ॥ ३२ ॥
अहंदेहातेंसोडून ॥ अहंब्रम्हास्मिआपण ॥ ऐसेंमानुनीकरींभजन ॥ आज्ञापूर्ण
वेदाची ॥ ३३ ॥ शरीराचेंक्रीडन ॥ तेंहोयत्रिगुणाचेयोगेंकरून ॥ अहंकर्तेपणा
तेंसांडून ॥ करींभजनवेदाज्ञाहे ॥ ३४ ॥ जीवशीवऐसेंहेंबोलणें ॥ तेंविद्याअवि
द्याजाणें ॥ विद्याअविद्यात्यजूनिकरणें ॥ हेआज्ञावेदाची ॥ ३५ ॥ श्रुतिअणोरणी
यान्महतोमहीयान् ॥ अणूम्हणजेअतिसूक्ष्म ॥ त्यासूक्ष्मींआत्माराम ॥ सूक्ष्ममाझे
निउत्तम ॥ सांडाभ्रमद्वैताचा ॥ ३६ ॥ महतोमहीयान्असेंवचन ॥ मीसर्वांचा
आदिमध्यअवसान ॥ मजहूनिथोरनाहींजाण ॥ सर्वआत्मत्वजाणप्रकाशें ॥ ३७ ॥ ॥ ६ ॥
आत्मत्वींआत्मत्वआहे ॥ आत्मत्वींआत्मत्वपाहें ॥ आत्मवींआत्मत्वभासताहे ॥

१ श्रीकृष्ण २ अधोगतीचा वीज ३ गुण

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सांडीसोयद्वैताची ॥ ३८ ॥ हेंसर्वआत्मत्वचिअसे ॥ मीतूंपणआत्मत्वींवसे ॥ जैसादीपींप्रकाशजडलाअसे ॥ मीतूंपणतैसेंआत्मत्वीं ॥ ३९ ॥ कींअग्नींतजैसी उष्णता ॥ कींकापुरींपरिमळता ॥ पुष्पींजैसीसुगंधता ॥ आत्मत्वींतत्वतातैसेंमी तूंपण ॥ ४० ॥ आत्मत्वेंमीतूंप्रकाशलें ॥ मीतूंपणेंआत्मत्वभासलें ॥ हेंआत्मत्वचीजा णितलें ॥ जाणोनसंचलेंनिर्विकार ॥ ४१ ॥ हेंएकींअनेकभासलें ॥ हेआत्मत्वची प्रकाशिलें ॥ प्रकाशगिळोनियांतरलें ॥ विसरलेंउरलेंपण ॥४२॥ आहेआणिनाहीं॥ हेंआत्मत्वींआत्मत्वेंपाहीं ॥ अणुपासूनब्रम्हावरीपाहीं॥दुजेंनाहींआत्मत्वेंविण॥४३॥ जैसेतरंगहोतीसागरापासोन ॥ त्यामाजीसागरचिआहेजाण ॥ नांवरूपचिहेंभि न्न ॥ येऱ्हवींजीवनदोठायींएकाचि ॥ ४४ ॥ कल्लोळसागरदोनीएक ॥ तैसेआत्मत्वीं जीवशिवदेख ॥ ऐसेंजाणोनीसम्यक् ॥ एकींअनेकपहावें ॥ ४५ ॥ सागरींलहरीए कचीजीवन ॥ परीवायुसंगेंतरंगफेन ॥ याचिनांवेंरूपेंअन्य ॥ येऱ्हवींजीवनपूर्णची ॥ ४६ ॥ तैसेंएकवस्तुचेठायीं ॥ चराचरभासेपाहीं ॥ म्हणवूनमीतूंपणाचीसोई ॥ सत्यनाहींभासोन ॥ ४७ ॥ सूक्ष्मतरीअणूपासून ॥ थोरपणानाहींप्रमाण ॥ ऐसा बोधवेदकरीआपण ॥ परीखूणनकळेचि ॥ ४८ ॥ काजेसद्गुरुचीनाहींकृपा ॥ म्हणो निचुकलेसत्यस्वरूपा ॥ लक्ष्यांशटाकूनवाच्यांशधापा ॥ देतीबापादेहसंगें ॥ ४९ ॥

१ वास २ लहानापासून ब्रह्मा पर्यंत ३ लाटा ४ समुद्र ५ लाटा ६ फेंस ७ उदक

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नेतिनेतीतिवेदश्रुती ॥ निरसिलेंवाच्यांशाप्रती ॥ परांपरतलीमागुती ॥ बोलाच
यारितीबाटनाहीं ॥ १५० ॥ आकाशींआहेअवकाश ॥ म्हणोनीतेथेंजन्मसुशब्दा
स ॥ ब्रम्हघनस्वप्रकाश ॥ म्हणोनवेदासमान्यकीं ॥ ५१ ॥ वेदजेंजेंपाहोंजाये ॥
तेथेंतेथेंकोंदलेंचिआहे ॥ म्हणवोनथकितझालापाहें ॥ जैसेअंतराळींपायपांगुळ ॥
ती ॥ ५२ ॥ जेंजेंत्रिगुणातीतआलें ॥ तेंतेंवेदेंवर्णिलें ॥ जैसेंस्वप्नजेंजेंदेखिलें ॥ तें
सांगीतलेंजागृतीं ॥ ५३ ॥ स्वप्नसांगणेंसंपलें ॥ मगसहजचीमौन्यपडलें ॥ तैसें
वेदासहीझालें ॥ मौन्यपडलेंवाचेसीं ॥ ५४ ॥ एकपाखंडीम्हणती ॥ पारनकळेवे
दाप्रती ॥ म्हणवोननेतिनेतिम्हणती ॥ मगइतरांचीगतीकाय ॥ ५५ ॥ वेदानकळे
जेथेंपार ॥ तेथेंमनुष्यकायपामर ॥ म्हणोनआत्मानुभावाचाविचार ॥ नकळेसा
चारकोणासीं ॥ ५६ ॥ आतांनिर्गुणाचीचर्चाकरिती ॥ तेमहाअज्ञानमंदमती ॥
जेफळांशाकर्मंकरिती ॥ तेसद्यःभोगितीसुख ॥ ५७ ॥ ऐसेंकांहींकर्मंकरावें ॥ जेंस
द्यःफळातेभोगावें ॥ जन्माआल्यानेंसुखघ्यावें ॥ बिषयसेवावेआवडीनें ॥ ५८ ॥ त्या
विषयसेवनास्तव ॥ जारणमारणस्तंभनपद्धतीसर्व ॥ मोहनउच्चाटणकरितांजीव ॥
मारितांकीवनयेची ॥ ५९ ॥ नानाबळीदानेंदेऊन ॥ साधितीभूतप्रेतांलागून ॥ ॥ ७ ॥
शरीरभोगासींजिवप्राण ॥ वेचितांहाणीनमानीच ॥ ६० ॥ जेदेहमीनोहेम्हणती ॥

१ वाणी २ रिकामी ३ वितंडवादी ४ फळाच्या आशेनें ५ तात्काळ फळ

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तेदेहभोगातेंवंचिती ॥ त्यांचेतोंडींपडलीमाती ॥ ऐसेंम्हणतीपाखंडी ॥ ६१ ॥
घरदारातेंसोडोनी ॥ सर्वविषयांपाठीदेऊनी ॥ राहिलेनिरभिमानहोऊनी ॥ तीहीं
जननीकष्टविली ॥ ६२ ॥ जेणेंअभिमानटाकिला ॥ तोदेहभोगासीवंचला ॥ जै
साआलातैसागेला ॥ विषयभोगालानसेवितां ॥ ६३ ॥ जरीपदरींअसेबहुपुण्यें
तरीचविषयभोगजाणणें ॥ दिधल्याविणनाहींपावणें ॥ दैन्यंभोगणेंकपाळाआलें ॥
॥ ६४ ॥ ज्याज्याकर्मींविषयप्राप्ती ॥ तेंतेंआदरेंचिकरिती ॥ जेथेंफळाशानदेखती ॥तें
त्यागितीमहामूर्ख ॥ ६५ ॥ ज्यासींआत्मत्वाचेंनाहींज्ञान ॥ तोचिशरीरभोगींअशक्त
जाण ॥ नैराशकर्मातेंसांडून ॥ करीआदरेंकाम्यकर्म ॥ ६६ ॥ ऐसेंपाखंडीमंदमती ॥
ज्यासींनाहींअनुभवप्राप्ती ॥ तेवेदवर्मातेंनेणती ॥ म्हणोनिभ्रमतीदेहसंगें ॥ ६७ ॥
जेवेदगुह्यातेंजाणती ॥ तेचिम्हणावेवेदांती ॥ जेवेदवर्मातेंनेणती ॥ तेजाणचित्तींवेद
बाह्य ॥ ६८ ॥ जोंस्वानुभवसुखावेगळा ॥ तोअंत्यजापरीवेदेंवाळिला ॥ म्हणोनवेद
बाह्यबोलाआला ॥ जोचुकलाआपणासीं ॥ ६९ ॥ ज्यासींसर्वत्रींआहीकंभावना
हीं ॥ तोचिवेदबाह्यपाहीं ॥ तोकर्मकरीजेंकांहीं ॥ तेंसर्वहीविटंबनं ॥ ७० ॥ जैसा
विटाळसीनेंआचारकेला ॥ तोअवघाचिवायांगेला ॥ कोणीस्पर्शनकरीचतिला ॥
अज्ञानाघडलाप्रसंगतैसा ॥ ७१ ॥ तोआपलेठायींशुद्ध ॥ परीवेदासींविरुद्ध ॥ कांजे

१ अभिमानरहित २ दरीद्र ३ आपणकोणयाचें ४ निष्काम ५ सकाम ६ त्यागिला ७ एक्यभाव ८ ढोंग

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वस्तुसांडूनिस्वतःसिद्ध ॥ काम्यउपाधीकरीतसे ॥ ७२ ॥ जेवेदोक्तकर्मकरिती ॥ परीवेदबाह्यजाणचित्तीं ॥ जेवींविटाळसीघरांतजैसी ॥ परीनातळेतीसींभ्रतारति चा ॥ ७३ ॥ लेकीसुनानातीपोती ॥ ठेवाठेवल्यासींअसेजाणतीं ॥ बोलतीयुक्तीप्रयु क्ती ॥ परीघरांतसरतीतेनोहे ॥७४ ॥ तैसाअसेस्वतःआचारी ॥ आणिविधीयुक्तक र्मकरी ॥ परीतोवेदबाह्यनिर्धारी॥ कांजेअंतरींनाहींस्वात्मबोध ॥७५॥ अंतरींनाहीं एकनिष्ठा ॥ बाह्यव्यवहारींवाढवीप्रतिष्ठा ॥ वर्मकर्माचीकरीचेष्टा ॥ भरावयापोटा लागुनी ॥ ७६ ॥ तेकर्मकरितांवेदबाह्य ॥ कांजेनेणतीवेदगुह्य ॥ विटाळसीच्यापरी होय ॥ घरांतनोहेसरतेची ॥ ७७ ॥ चारीदिवसजेव्हांहोती ॥ तेव्हांघरांतहोईलस रती ॥ तैसेचारीदेहनिरसती ॥ तेव्हांआत्मस्थितीजाणेल ॥ ७८॥ चारीदेहचारीशु न्य ॥ चारीअवस्थाचारीवाचाजाण ॥ जीवशिवमायाब्रम्ह ॥ हेचिखूणचौऱ्यासींची ॥ ७९ ॥ याचेंजोंझालेंनाहींनिरसन ॥ तोंवरीनकळेवेदाचीखुण ॥ गुह्यखुणेविणआ पण ॥ वेदबाह्यजाणनिश्चयेसीं ॥८०॥ ओंइत्येकाक्षरंब्रम्हअसे ॥ वेदबोलतअसे॥या चेंकोणाभानसे ॥ जीवदशेंभ्रमताती ॥ ८१ ॥ एकासद्गुरुकृपेविण ॥ नोहेंचिओंका रविवरण ॥ जोंवरीनोहेओंकाराचेंज्ञान ॥ तोंवरीजाणवेदबाह्य ॥८२ ॥ ओंकारवेदा चेंकारण ॥ वेदझालेओंकारापासून ॥ सर्वसृष्टीचेंमंडण ॥ झालेंजाणओंकारीं॥८३॥

१ ब्रह्म २ नरिवे ३ मुख्य कर्माची ४ नाश पावती ५ नाश ६ विचार ७ भूषण

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जोंवरीनोहेओंकाराचेंज्ञान ॥ तोंवरीज्ञानतेंचिअज्ञान ॥ भूसकांडितांकण ॥ प्राप्ती नोहेकल्पांतीं ॥८४॥ फेणपीतांतृषाकांहीं ॥ सर्वथाजाणारनाहीं ॥ तैसीशब्दब्रम्हेंसोई ॥ नकळेपाहींओंकाराची ॥ ८५ ॥ तरीओंकारसर्वाचेंसार ॥ गुरुज्ञानेंकळेसाचार ॥ व्युत्पत्तीनेंनकळेपार ॥ हानिर्धारवेदाचा ॥ ८६ ॥ हीवेदाचीआज्ञाप्रमाण॥म्हणोनीयांभावेंकरून ॥ अंतरसाक्षीहोवोन॥करावेंभजनवेदाज्ञा ॥८७॥ अहंब्रम्हास्मि ऐसेंज्ञान ॥ नाहींज्यानरालागुन ॥ तोवेदवाचापशुजाण ॥ यदर्थींदेप्रमाणश्रुती ॥ ॥ ८८ ॥ अहंब्रम्हास्मियोवेदः ॥ ससर्वंभवभृन्नतः ॥ नाभूत्यानेशतद्देवा ॥ तस्मात्मेश्यां भवद्दिश ॥ ८९ ॥ ब्रम्हतोमीस्वयंआपण ॥ आणीजगहीब्रम्हस्वरूपजाण ॥ देवभूतहेंवचन ॥ अप्रमाणसर्वहीं ॥ ९० ॥ ऐसानिश्चयज्यांबाणला ॥ तोचिबुद्धिवंतभला ॥ जगासमेतआपणला ॥ भासझालाब्रम्हची ॥ ९१ ॥ तोचिब्रम्हानुभवीजाण ॥ इतरतोवेदबाह्यपूर्ण ॥ म्हणोनआलेंपशुपण ॥ दैवाधीनझालातो ॥ ९२ ॥ ॥ श्लोक ॥ अन्योसावहमन्योस्मिउपासतेऽन्यदेवताः ॥ नसवेदनरोब्रम्हसदेवानां यथापशुः ॥ ९३ ॥ ॥ टिका ॥ ॥ जगापरतेंब्रम्हआहे ॥ जगब्रम्हरूपनोहे॥ ऐसेंजोमानिताहे ॥-तोचिपाहेपशु ॥ ९४ ॥ आपलेंब्रम्हत्वनाहींजाणत ॥ तोचिदेवातेंउपासित ॥ मगकाम्यकर्मकरीत ॥ पोटभरीतदेवाचें ॥ ९५ ॥ पशुजैसापराधनिआ

१ फेस २ ताहान ३ मीचब्रह्मआहें असेंमानणे ४ याअर्थाविषयीं ५ ठसावला ६ बराबर ७ वेदमार्गसुटलाअसतो तो

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हे ॥ जिकडेनेलातिकडेजाये ॥ तैसेंअनुभवेंवीणप्राण्यासींहोये ॥ भजतांहेदेव
तातें ॥ १६ ॥ अहंब्रम्हास्मिचुकला ॥ म्हणोनजीवदशेआला ॥ तेणेंवृद्धीझाली
कल्पनेला ॥ म्हणोनझालापराधीन ॥ १७ ॥ ब्रम्हदशासांडून ॥ जोम्हणेजीव
आपण ॥ तोचिमहाअज्ञान ॥ पशुजाणनिश्चयें ॥ १८ ॥ आहारनिद्राभयमैथुन ॥
हेंसर्वांसींआहेज्ञान ॥ परीएकाआत्मज्ञानाविण ॥ पशुपणआलेंकीं ॥ १९ ॥
ब्रम्हज्ञानतेंविज्ञान ॥ इतरतेंसर्वअज्ञान ॥ तरीब्रम्हज्ञानम्हणसीकोण ॥ तेहीखु
णसांगतों ॥ २०० ॥ ब्रम्हज्ञानम्हणजेकांहीं ॥ जेथेंआपपरनाहीं ॥ एकजाणों
नठाईं ॥ भक्तीपाहींकरीत ॥ १ ॥ तेभक्तिकैसीम्हणसी ॥ ब्रम्हत्त्वेंपाहेसर्वांसीं ॥
जोसागरकल्लोळेंसी ॥ भक्तीतेसींकरीतूं ॥ २ ॥ शरिरींजैसेअवयवआहेती ॥ पा
हातांवेगळेभासती ॥ परीतेशरीरासींजडलेती ॥ व्यापारकरितीवेगळाले ॥ ३ ॥
व्यापारवेगळालेकरिती ॥ परीएकाचशरीरींआहेती ॥ तैसीवेगळालीभूताकृती ॥
परीअसतीएकत्त्वें ॥ ४ ॥ जैसिंचित्रेंआणोन ॥ परिभिंतीएकचिजाण ॥ तैसाभूतींभ
गवान ॥ ऐसेंजाणोनकरीभक्ती ॥ ५ ॥ ऐसाअद्वैतबोधझाला ॥ तोचिज्ञानीसदैवभ
ला ॥ जोवेदगुह्यातेंपावला ॥ पशुत्वेंमुकलाम्हणोनी ॥ ६ ॥ ज्यासींआपलेंनाहींज्ञा
न ॥ तोचिवेदबाह्यजाण ॥ म्हणोनीआपलेंपशुपण ॥ फिरवनशब्दब्रम्हाचें ॥ ७ ॥ ना

१ आपणआणिदुसरा असाभेदनाहीं २ सर्वठिकाणी ३ समुद्राच्यालाटेसीं

CC-0 Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नादेवतांच्याउपासना ॥ हेंचिमहावनजाणा ॥ काम्यकर्माचींतृष्णा ॥ सेवितांमनाह
र्षवाटे ॥ ८ ॥ श्रुति ॥ यतोवाचोनिवर्तंते ॥ अप्राप्यमनसाहस ॥ टिका ॥ वचनासीं
अप्राप्त ॥ मनासींअगोचरसत्य ॥ ऐसेंवेदअसेबोधित ॥ यातेंनाहींजाणतम्हणोन
पशु ॥ ९ ॥ अहंब्रम्हास्मिंजाणीतलें ॥ तेव्हांपशूत्वबावझालें ॥ त्यातेंचिवेदेंअंगिका
रिलें ॥ इतरांवाळिलेंअंत्यजोपरी ॥ २१० ॥ म्हणोनीवेदाचीआज्ञाप्रमाण ॥ माना
वीहेंभक्तीलक्षण ॥ जोवेदाज्ञेसीदुऱ्हावीजाण ॥ अभक्तपणतेणेंचित्यासीं ॥ ११ ॥ त
रीवेदांतीतेकोण ॥ त्याचेंसांगतोंविवरण ॥ कथावाढलीजाण ॥ धरीखूणजीवींहे ॥
॥ १२ ॥ वेदाचीआज्ञापाळिती ॥ तेचिजाणावीहरिभक्ती ॥ साक्षीहोवोनिशरिरींरा
हती ॥ भक्तिकरितीशरीरीं ॥ १३ ॥ जैसावारावाजोनजातसे ॥ परीडोलतोवृक्षीं
उरलासे ॥ प्रारब्धयोगेंतैसें ॥ होतअसेशुभाशुभ ॥ १४ ॥ अनुभवेंमुक्तझालोंआ
पण ॥ परीशरीरगेलेंनाहींनासोन ॥ तरीशरीरआहेवायुआधीन ॥ तेंवावर्तकेसेंहो
य ॥ १५ ॥ यदर्थींएकदृष्टांत ॥ सांगतोंतुलादेईचित्त ॥ जेणेंबोधेतुझेंचित्त ॥ होयअं
तकल्पनेचा ॥ १६ ॥ तेकल्पनाकोणम्हणसी ॥ तेंहीसांगतोंपरियेसी ॥ मागेंतूंम्ह
णतहोतासी ॥ भजूंकोणासींद्वैतनाहीं ॥ १७ ॥ गांवावेगळेंशिवेसीं ॥ कोणेकल्पावें
मनासीं ॥ देवावीणदेउळासीं ॥ कासयासींबांधावें ॥ १८ ॥ आधींमजसींठावना

१ सकाम २ अज्ञा ३ नदिसगोरें ४ मी ब्रह्म आहें ५ भूमें ६ अतिशूद्राप्रमाणें ६ दूरकरी ७ विचार ८ व्यर्थ ९ याअर्थांविषयीं

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हीं ॥ तरभिजावेंकोणाकांहीं ॥ हेंपाखंड्याचेंमतपाहीं ॥ अनुभवनाहींज्यालागीं ॥
॥ १९ ॥ एकमेवाद्वितीयंनास्ती ॥ तरीकोणाचीकरावीभक्ती ॥ ऐसेंबोलतीमंदमती
जेनेणतीआपणातें ॥ २० ॥ जरीतेआपणाआपणजाणते ॥ तरीऐसेंनबोलते ॥ सं
सारींसहजराहते॥भक्तिकरितेआदरें ॥२१॥ कांजेशरीरप्रारब्धाधीन ॥ हेंअसतेंत्या
सींज्ञान ॥ त्याचासांडोनप्रयत्न ॥ सहजजाणराहाते ॥ २२ ॥ शरीरभोगसहजराह
ते ॥ आपणासवेगळेजाणते ॥ साक्षित्वेंभक्तिकरिते ॥ पाळितेवेदवचना ॥ २३ ॥ जें
थींचेंतेथेंकर्मस्थापोन ॥ करितेवेदाचेंपाळण ॥ ज्यासींनाहींआपलेंज्ञान ॥ वेदम्ह
णोनपाखंड ॥ २४ ॥ पाखांडीब्रम्हझालोंम्हणती ॥ परीशरीरभावनानसांडिती ॥
आदरेंसंसारकरिती ॥ आणित्यागितीभक्तीतें ॥ २५ ॥ माझेंतुझेंम्हणती ॥ ज्ञा
नाज्ञानविचारिती ॥ महत्वालागींमरती ॥ शब्देंचिठकवितीलोकांसीं ॥ २६ ॥
हळहळतीगेलीनाहीं ॥ धनाशातीवसेदेहीं ॥ ममताजडलीसेपाहीं ॥ स्थूळांचा
नाहींविसरु ॥ २७ ॥ कामक्रोधाचेंआयतन ॥ निंदाद्वेषाचितोखाण ॥ लोभमो
हाचेंअधिष्ठान ॥ नसाहेवचनकोणाचें ॥ २८ ॥ सुखझाल्यासुखावत ॥ जैसानि
र्वातदीपधरीजोत ॥ दुःखझाल्याखेदयुक्त ॥ वायूनेंजोलहालेजेवीं ॥ २९ ॥ शरी ॥१०॥
रींचेष्टासर्वआहेती ॥ आणिज्ञानकथनकथिती ॥ एकमेवाद्वितीयंनास्ती ॥ साक्ष

१ सर्व एकच आहे दुसरें कांहीं नाहीं. २ ... ३ ... ४ स्थूळ देहाचा.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

देतीवेदाची ॥ ३० ॥ अरेहेंवचनसत्यचिअसे ॥ म्हणेएकआत्मासर्वत्रींवसे ॥ म
हद्भूतेंतेअनायासें ॥ दृश्यत्वेंदिसतीवेगळाली ॥ ३१ ॥ तरीहशब्दद्रष्टांतेंसांडोन ॥ प
हास्वयेंचिब्रम्हहोवोन ॥ हींतीत्यासींनकळेचिखुण ॥ पाखंडम्हणोनबोलत ॥ ३२ ॥
ब्रम्हअद्वैतएकआहे ॥ हेंकोणम्हणतीनोहे ॥ परीआकारभिन्नभिन्नस्वतांआहे ॥
भक्तिहोयआकारें ॥ ३३ ॥ निराकारींप्रपंचपरमार्थ ॥ ज्ञानअज्ञानजातगो
त ॥ देवीदेवताभक्त ॥ तीर्थव्रतनाहींकीं ॥ ३४ ॥ पिंडब्रम्हांडरचना ॥ चारी
वेदचौसष्टीकळाजाणा ॥ जपतपअनुष्ठाननाना ॥ नाहींरचनासृष्टीची ॥ ३५ ॥
त्याचेमनेंविनामननकीजे ॥ अनुभवाविणअनुभवजाणिजे ॥ कांहींचआपणनहो
ईजे ॥ तेव्हांचपाविजेनिर्गुणपैं ॥ ३६ ॥ तेथींचीखूणअनुभवीजाणती ॥ जेस
द्गुरूचेअनुग्रहीअसती ॥ तेशरीरींसाक्षित्वेंवसती ॥ पाळितीवेदमर्यादा ॥ ३७ ॥
ज्यासींनाहींअनुभवज्ञान ॥ तेकरितीबाह्यपूजन ॥ आगममार्गींजातीप्रवीण ॥
चक्रेंजाणभरताती ॥ ३८ ॥ त्याचक्राचीस्थिती ॥ बोलतांनयेमजप्रती ॥ आ
दरेंविषयसेविती ॥ इंद्रियकरितीतृप्तते ॥ ३९ ॥ जैसेंअंधळेंगुरुं ॥ लाधलेंहि
रवाधारु ॥ तेंविसरलेंमागीलमोहरु ॥ पुढीलविचारनेणवेची ॥ ४० ॥ तेंमम
तालोभींभरलें ॥ चरवृपुढेंचीचालिलें ॥ मार्गीआडांतपडतेंझालें ॥ मगपडलेंच

१ पाहण्यास योग्य २ दाखविणारा ३ मूर्तिपूजा ४ कर्म मार्ग ५ मिळाला

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रफडीत ॥ ४१ ॥ वरतेंयेतांनये ॥ मध्येंतोजीवनजाये ॥ ऐसेंपाखंडीयासींहो
ये ॥ पडताहेभ्रमकुपीं ॥ ४२ ॥ तैसेंझालेंप्राण्यासींजाण ॥ अंघतोआत्मानुभवा
वीण ॥ आणिविषयाचेंतृणलाधून ॥ तेणेंचालेरामशब्दाचें ॥ ४३ ॥ निंदास्तुती
च्यादरडीउतरस ॥ देहाभिमानाच्यापर्वतींराहत ॥ नाहींआपल्याब्रम्हत्वाचाहेत ॥
म्हणोनीफिरतमायावनीं ॥ ४४ ॥ जेंमनबुद्धीसींअगोचरआहे ॥ तेंयाच्यासाधनेंसा
धेलकाये ॥ ऐसीज्यासीनकळेसोये ॥ तोचिपाहेपशुखरा ॥ ४५ ॥ तोपूर्णत्वाचागां
वटाकुन ॥ फिरेमायावनींआपण ॥ जेथेंकामक्रोधाचेंअखंडस्थान ॥ विषयाचें
तृणवाढलें ॥ ४६ ॥ जेथेंलोभाचेफोकवाढले ॥ तेंगगनाशींपाहावयागेले ॥ तेइच्छा
फळींफळाआले ॥ घडलागलेअमुपची ॥ ४७ ॥ विद्यामदगजासीपाहीं ॥ जेथें
पारावारनाहीं ॥ मोहअजंगरठायींठायीं ॥ जेसदापाहीभुकेले ॥ ४८ ॥ जेथेंमन
मृगचमकत ॥ तोअसेविकारसमवेत ॥ त्यावरीमांडीबुद्धीघात ॥ परितोजातटाको
नी ॥ ४९ ॥ नानामतांतराचेकांहीं ॥ वृक्षांसीपारचनाहीं ॥ कल्पनेचेकावळेपाहीं ॥
ठाईठाईकोकाती ॥ ५० ॥ तृष्णेचेवेलचालिले ॥ तीहींतेंवनचिव्यापिलें ॥
त्यावनींपशुपडले ॥ सांपडलेभ्रमकुपीं ॥ ५१ ॥ असेंयाचेंआचरण ॥ तेंदुष्टरूपचि
जाण ॥ म्हणोनीआलेंपशुपण ॥ फिरतीवनशब्दब्रम्हाचें ॥ ५२ ॥ अनिर्वाच्यव

अ॰ ९ ॥ ११ ॥

१ आकाश २ अतीशय ३ मदरूढीहली ४ [illegible] ५ मोह हाच अजगर ६ काय काय करितात ७ ब्रह्म

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

स्तूचेठाईं ॥ शब्दहेचिमायापाहीं ॥ येणेंचिपाखांडीठाईंठाईं ॥ तूंहेसोयसांडींरे ॥
॥ ५३ ॥ ऐसियाचासंगकरितां ॥ पाविजेआत्मघाता ॥ बाघाचासंगकरितां ॥ सुख
वार्ताकैंचीपैं ॥ ५४ ॥ दुर्गंधीचासंगकरितांजाण ॥ दुर्गंधीचपाविजेआपण ॥ तेसें
देहाचेसंगेंकरून ॥ कैचेंपावनहोइजे ॥ ५५ ॥ वेडेवेडियासीभेटले ॥ तेथेंसुख
कायझालें ॥ तैसेदेहवादींनाडले ॥ तेंचिबोलिलेवेदबाह्य ॥ ५६ ॥ कींजेअहि
क्यतासांडूनिदिली ॥ आणिद्वैतवादीप्रवर्त्तली ॥ तेआपणाआपणवंचिली ॥ अ
वघीपडलीभवचक्रीं ॥ ५७ ॥ तरीआतांतूंएककरीआपण ॥ सांडूनियांमीतूंपण ॥
अद्वैतबोधकरीभजन ॥ पाखंडपणसांडीजे ॥ ५८ ॥ तूंअनुभवेंब्रम्हझालासी
पूर्ण ॥ परीजोंवरीशरीरआहेवर्तमान ॥ तोंवरीवेदाचीआज्ञाप्रमाण ॥ करीआ
पणरत्नाकरा ॥ ५९ ॥ कांजेतूंतोकर्मातीत ॥ परीशरीरेंचीकर्महोत ॥ कर्मेचिश
रीरशोभत ॥ धरींहेतजीवींहा ॥ ६० ॥ ज्याज्यावर्णीजेजेजन्मले ॥ त्यांचेंत्या
सींकर्मलागलें ॥ जेंजेंविधियुक्तबोलिलें ॥ तेंचिकेलेंपाहिजे ॥ ६१ ॥ शिवोभू
त्वाशिवंजयति ॥ हेचिवेदगुह्यजागती ॥ ऐसेंजाणोनिकरीभक्ती ॥ सर्वभूतींएक
पाहे ॥ ६२ ॥ शरीरकर्मसहजचिआहे ॥ हेंटाकिल्यानेंनवजाये ॥ कर्मटाकिलेंम्हण
तांपाहे ॥ वेदबाह्यबोलिजे ॥ ६३ ॥ शरीराचींकर्मेंटाकिलीं ॥ परीमनामाजीभरलीं

१ एकपणा २ एकब्रह्म मानीत नाहींत ३ संसार रूप चक्र ४ शास्त्रमार्गात अनुसरणारे.

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मनेंचिबद्धताझाली ॥ मुक्ततागेलीमनायोगें ॥ ६४ ॥ कर्मसांडिलेंनाहीं ॥ मनींकल्प नाभरलीपाहीं ॥ शरीरकर्मटाकिलेंज्यांहीं ॥ तेपडलेप्रवाहींभवजन्माचे ॥ ६५ ॥ म्हणोनीवेदेंजेंसांगितलें ॥ ज्याज्यावर्णीजेंजेंकर्मनेमिलें ॥ तेंतेंसाक्षित्वेंपाहिजेकेलें ॥ जेणेंआपलेंहितहोय ॥ ६६ ॥ व्यासआणिसनकादिक ॥ नारदआणिशुकजनक ॥ ऋषिमूनीसकळिक ॥ भक्तिदेखकरिताती ॥ ६७ ॥ तूंमागेंम्हणतहोतासी ॥ ठावना हींहूतासीं ॥ तरीम्यांभजावेंकोणासी ॥ ऐसीआशंकाघेतलीस ॥ ६८ ॥ तरीतुजहून कांहीं ॥ सनकादिकमूर्खनाहीं ॥ तेहीभक्तिकरितीपाहीं ॥ सांडोनिसोईभेदाची ॥ ॥ ६९ ॥ तुजकायसनकादिकाहून ॥ अधिकझालेंज्ञान ॥ आतांसांडिशहाणपण ॥ करींस्मरणआवडीनें ॥७०॥ जेंजेंहोईलदर्शन ॥ तेंतेंजाणिजेभगवान ॥ त्यासीचम्ह णावेंस्मरण ॥ सांडीभानकल्पनेचें ॥ ७१ ॥ अंतरनिर्मळज्ञानेंकरून ॥ बाह्यनिर्मल कर्मकरून ॥ वाचाशुद्धकरीहरीकीर्तन ॥ तीर्थादिगमनेंचरणशुद्धी ॥ ७२ ॥ वाचेसीं जरीनाहींस्मरण ॥ तरीव्यर्थइतरकरीजल्पन[1] ॥ म्हणोनकरितांअखंडहरिकीर्तन ॥ वाचेचेंजाणसार्थक ॥७३ ॥ हरिस्मरणाविणवाचा ॥ तेथेंसंचारहोयपापाचा ॥ पापें घातहोयत्याचा ॥ पावेनर्काचाअधिकार ॥ ७४॥ ऐसेंजाणोनसावकाश ॥ स्मरणक रींरात्रंदिवस ॥ येणेंचशुद्धतावाचेस ॥ धरींविश्वासजीवींहा ॥ ७५ ॥ करीप्रतिमे[2]चेंपू ॥१२॥

१ बोलणे २ मूर्तीचे

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जन ॥ करावेंब्राम्हणाचेंचरणक्षाळेंण ॥ हरीमंदिरसंमार्जन ॥ येणेंचिपावनकरहोती ॥ ७६ ॥ नेत्रींदिसेजेंजेंकांहीं ॥ तेंतेंहरिरूपचिपाहीं ॥ सांडोनीनानारंगाचीसोई ॥ पावनपाहींनेत्रतेणें ॥ ७७ ॥ शरीरेंदेवासकवळोन ॥ लोटांगणकीजेतिआपण ॥ संतसेवेसींलावावेंमन ॥ तेणेंशरीरपावनरत्नाकरा ॥ ७८ ॥ गुरुज्ञानेंअंतरशुद्धकेलें ॥ वेदवाक्येंबाह्यशुद्धझालें ॥ अंतरबाहेरहरिभक्तिलाविलें ॥ तेंचिबोलिलेंब्रम्हज्ञानी ॥ ॥ ७९ ॥ आपणसर्वसाक्षीहोवोन ॥ करीविधियुक्तआचरण ॥ हरिभजनींअल्हादपुर्ण ॥ तोचिजाणब्रम्हज्ञानी ॥ ८० ॥ निंदास्तुतीसांडुनी ॥ राहिलालीनहोउनी ॥ अखंडलोळेसंतचरणीं ॥ तोचिब्रम्हज्ञानीबोलिजे ॥ ८१ ॥ जेंजेंकर्मबोलिलेंजेथें ॥ तेंतेंस्थापितजायतेथें ॥ आत्मवंत्मानींसर्वभूतें ॥ मानावात्यातेंब्रम्हज्ञानी ॥ ८२ ॥ सद्गुरुचरणींदृढभाव ॥ गुरुरूपदेखेसर्व ॥ सांडोनियांमिथ्याभाव ॥ पाहेदेवसर्वाभूतीं ॥ ॥ ८३ ॥ सुखझाल्यासुखावेना ॥ दुःखझाल्यानसांडीभजना ॥ अखंडकरीवेदांतश्रवणा ॥ तोचिजाणाब्रम्हज्ञानी ॥ ८४ ॥ मागीलआठवणानाहीं ॥ पुढीलचिंतानकरीकांहीं ॥ जेंजेंहोयज्यासमईं ॥ त्यांत्यांनाहींपाठमोरा ॥ ८५ ॥ मायातीमुळींचनाहीं आहिक्यतासर्वाठाईं ॥ हरिभजनींआळसनाहीं ॥ तोचिपाहींब्रम्हज्ञानी ॥ ८६ ॥ अशुभनवदेचिवाणी ॥ जोनिर्विकल्पमनीं ॥ मरणाआधींराहीलामरोनी ॥ तोचिज्ञा

---

१ पूजा २ धुणे ३ देवळ सारवणें ४ हात ५ मन ६ नम्र ७ आपल्यासारखे

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥१३॥ नीबोलिजे ॥ ८७ ॥ विद्यावैभवचतुर ॥ ज्ञानचातुरींभांडार ॥ परीनसेचिअहंकार ॥
तोचिसाचारब्रम्हज्ञानी ॥ ८८ ॥ ज्याज्यावर्णीजेंकर्मबोलिलें ॥ तेंतेंस्थापीतजायवही
लें ॥ आत्मवैभवजोडलें ॥ धरूनीराहिलेतेचिज्ञानी ॥ ८९ ॥ आकाशपडतांकोसळु
न ॥ परीनडळमळीत्याचेंमन ॥ राहेसाक्षीहोवोन ॥ तोचिजाणब्रम्हज्ञानी ॥ ९० ॥
जपतपअनुष्ठान ॥ करीतीर्थव्रतालागुन ॥ वेदशास्त्राचेंवाडवीमहिमान ॥ तोचिएक
पूर्णज्ञानी ॥ ९१ ॥ परस्त्रीमातेसमान ॥ परधनविष्टेसमान ॥ सांडोनिरोहथोरपण॥
तोचिपूर्णब्रम्हज्ञानी ॥९२ ॥ मागचेंभानसांडूनी ॥ राहेसहजींसहजहोवोनी ॥ काळ
वेळहरिभजनीं ॥ नवीचारीमनींज्ञानीतोची ॥ ९३ ॥ शरीरभोगातेंआळसी ॥ हरिभ
क्तीकरीआदरेंसीं ॥ सांडूनियांलौकिकासीं ॥ कीर्तनासींकरीतसे ॥ ९४ ॥ टाळमृदं
गाचेघोषें ॥ कीर्तनकरीअतिहर्षें ॥ प्रेमेंनाचतउल्हासें ॥ आत्मसौरसेंडुल्लत ॥ ९५ ॥
अबिनाशवस्तूतेंसत्य ॥ दृश्यभासमिथ्याभासत ॥ ऐसेंअखंडगात ॥ तटलटानाचतवे
ळोंवेळां ॥ ९६ ॥ कृष्णकेशवगोविंदहरी ॥ ऐसींचअखंडगर्जनाकरी ॥ जेणेंज्ञानबोध
अंतरीं ॥ तैसेपरीसांगत ॥ ९७ ॥ जेणेंअज्ञानाहोयज्ञान ॥ ऐसेंलाविअनुसंधान ॥
भक्तिज्ञानवैराग्यपूर्ण ॥ करीनिरोपणवेळोवेळां ॥ ९८ ॥ सन्मार्गलागेजनासीं ॥ ॥१३॥
तेचिकरीआदरेंसीं ॥ आपणतरोनितारीइतरासीं ॥ तोचिनिश्चयेसींब्रम्हज्ञानी ॥

१ ऐश्वर्य २ स्वप्रेमाने

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥ ९९ ॥ अणुपासोनब्रम्हवरी ॥ म्हणेंहेंमजमाझारीं ॥ जनाजाणेअवेवांपरी ॥ म्ह
णोनीकरीबोधसकळां ॥ ३०० ॥ आपुलेसर्वजाणुन ॥ म्हणेअवघ्यामाजीमींचआ
पण ॥ ऐसेंजाणोनआकळीमन ॥ सांगेज्ञानसकळांसीं ॥ १ ॥ जोनायकेमनवाळून ॥
त्यासींसांगेकरजोडोन ॥ म्हणेंहेंमजद्यावेंदान ॥ करुणांकरुनबोलत ॥ २ ॥ जै
सानेत्रामाजीकणजातां ॥ तोकाढींतंवगोडनलागेचित्ता ॥ तैसासाळ्याभोळ्या
सींबोधकरितां॥आळससर्वथांनकरीच॥३॥त्यासींब्रम्हज्ञानीम्हणावें॥इतरतेपाखांजा
णावें ॥ ऐसेंजाणोनीमनोभावें ॥ करावेंसांगीतलेंतें ॥ ४ ॥ मागेंजेंनिरोपणकेलें ॥
जेंतूंतेंचौदेहांपासूनसोडाविलें ॥ तुझेंतुजभासविलें ॥ चोरलेंगुह्यहोतेंजें ॥ ५ ॥ वेग
ळेंआपणासिजाणूनी ॥ भक्तिकरीआदरेंकरूनी ॥ संदेहअसेलतरीमनीं ॥ बोलवच
नींरत्नाकरा ॥ ३०६ ॥ सद्गुरुवाक्यऐकोनी ॥ बोलेरत्नाकरकरजोडूनी ॥ संदेहना
हींमाझेमनीं ॥ परीएकविनवणीआहेस्वामी ॥ ३०७ ॥ त्रिकांडवेदबोलिलाआपण ॥
कर्मउपासनाअध्यात्मजाण ॥ सत्वरजतमात्रिगुणात्मकपूर्ण ॥ ब्रम्हत्रिगुणाहूनवेगळें
॥ ३०८ ॥ ब्रम्हतेंत्रिगुणात्मकआहे ॥ कर्मत्रिगुणयोगेंहोये ॥ याच्यायोगेंसार्थकका
ये ॥ सांगासोयअसेलतैशी ॥ ३०९ ॥ कर्मएकविधनाहीं ॥ ऐसीचउपांसनापाहीं ॥
कळस्यानकरावेंकांहीं ॥ तेसांगासोईमजलागीं ॥ ३१० ॥ वेदाचीमर्यादापाळिसी॥

---

१ सूक्ष्म पदार्थ २ खोटें ३ हात ४ दया ५ संशय ६ प्रकार ७ भक्ति

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तेंचिजाणावीहरीचीभक्ती ॥ ऐसेंस्वामीबोलिलेती ॥ तेणेंचित्तींसंदेहझाला ॥३११॥ कर्मणोगहनागतिः ॥ ऐसेंअसेगीताबोलती ॥ त्याकर्मींमजदीनाप्रति ॥ कांगोवितां नकळे ॥ ३१२ ॥ मीतोंझालोंकर्मातीत ॥ सर्वहेंमजमाजीभासत ॥ कर्मकरावयामा झेंचित्त ॥ नाहींघेतगुरुमूर्ती ॥ ३१३ ॥ कर्मकरूनकोणतरला ॥ ऐसाम्यांनाहींऐकि ला ॥ ब्रम्हस्थितीबाणलीमला ॥ कैसेंकर्मालाकरूंमी ॥ ३१४ ॥ तुम्हीचसर्वेनिरसि लें ॥ चौदेहातेंउठविलें ॥ मागुतेंकर्मस्थापिलें ॥ हेंवाटलेंनवलमज ॥ ३१५ ॥ ऐसेंव देदेहातीतहोऊन ॥ आणिकर्मतेंनोहेदेहावीण ॥ हेंजैसेंअसेलतैसेंआपण ॥ सांगाक रूनवेगळालें ॥ ३१६ हाअध्यायतरीपूर्णझाला ॥ पुढलेअध्यायींसांगेनतुला ॥ जेणें बोधहोयमनाला ॥ होईकथेलासावध ॥ ३१७ ॥ नऊअध्यायझालेपूर्ण ॥ आतांदा हाव्याचाआरंभजाण ॥ पुढेंअपूर्वहोईलनिरुपण ॥ जेणेंमननिवेतुझें ॥ १८ ॥ तूंजाणोननेणताहोसी ॥ हेंकळोंआलेंमजसी ॥ रामानंदम्हणेवेगेंसीं ॥ सावधकथे सींरत्नाकरा ॥ ३१९ ॥ जेंगुह्यसर्वांतीतहोतेंचोरलें ॥ तेंरत्नाकराप्रगटकेलें ॥ मा झेंसमाधानझालें ॥ सांगेनपुसिलेंसर्वही ॥ २० ॥ हादीपरत्नाकरग्रंथ ॥ जेणेंअ ज्ञानाचेंबोधेंचित्त ॥ संतोषतीसाधुसंत ॥ हेंमथितवेदांताचें ॥ २१॥ जेसद्गुरुचेअनुग्रा हीहोती ॥ तेयातेंअमृतापरीसेविती ॥ पाखांडीऐकोनीउफाळीती ॥ जेवर्ततीजी

१ कर्माची गती कठीण आहे.

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वदशें ॥ ३२२ ॥ चंद्रामृतचकोराप्राप्त ॥ कावळ्याचेंहृदयफुटत ॥ तैसागुरु भक्तघेतीअर्थ ॥ नीगुरेकरीत वादसदा ॥ २३ ॥ जैसेंअंजनेंविणनिधान ॥ प्राप्तनोहेचिजाण ॥ तैसेंनिगुऱ्यासींनोहेज्ञान ॥ वादम्हणोनीकरिताती ॥ २४ ॥ दीपरत्नाकरींब्रम्हज्ञान ॥ करतळामळकेलेंजाण ॥ जैसेंसमुद्रमंथनकरून ॥ काढिलेंनिधान अमृत ॥ २५ ॥ त्याअमृतेंदेवसुखीझाले ॥ आणिराहूचेंमस्तकचिगेलें ॥ तैसेंगुरुभक्तासींअनुभवाआलें ॥ इतरपडलेद्वंद्वभेदीं ॥ २६ ॥ नित्यदेहींभावधरिती ॥ हाग्रंथ चीगुरुम्हणती ॥ तेहीसुखातेंपावती ॥ संदेहचित्तींनसावा ॥ २७ ॥ सिद्धानंदाचेनिप्रसादें ॥ बोलेरामानंदपदें ॥ रत्नाकराचेनिसंवादें ॥ ग्रंथविनोदेंचालिला ॥ २८ ॥ इतिश्रीचिदादित्यप्रकाशेदीपरत्नाकरग्रंथेअद्वैतभक्तियोगोनामनवमोऽध्यायः ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ एकंदरओंव्या ॥ ३२८ ॥ ॥ ॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥ इति नवमोऽध्याय समाप्त ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ ओंनमोसद्गुरुराया ॥ निर्गुणनिरामयां ॥ भवच्छेदकाकरुणाल
यां ॥ तुझियापायांदंडवत ॥ १ ॥ तूंजैसातैसाचअससी ॥ आदिमध्यअवसाननाहीं
तुजपासीं ॥ तुझापारनकळे [illegible]वणासीं ॥ तूंसर्वांसींअगोचर ॥ २ ॥ कांहींजाणोंजा
तातितुजला ॥ तरीतूंनकळसीकवणाला ॥ कांजेनेणवेबुद्ध्यादिकांला ॥ तर्केबुडा
लाजाणवेचा ॥ ३ ॥ कांजेंतूंसर्वांचेआदी ॥ तुझामहिमानेणवेवेदीं ॥ मगसहजींकुं
ठितइतरांचीबुद्धी ॥ तूंअनादीविश्वंभरा ॥ ४ ॥ ऐसियातुजनमन ॥ माझेंकरावेंसमा
धान ॥ मागिलेअध्यायींदिधलेंअभयदान ॥ जेंसांगेनपुढिलेअध्यायीं ॥ ५ ॥ तेंऐ
कावयाचित्त ॥ माझेंझालेंसेउदित ॥ तुम्हीतोदिनदयाळवंत ॥ सांगाहितहोयजेणें
॥ ६ ॥ माझेमनोरथपूर्णकेले ॥ चौदेहातेंनिरसिलें ॥ साक्षीकरोनिठेविलें ॥ आतां
उरलेंतेंसांगा ॥ ७ ॥ तुम्हींजोंजोंसांगतांकथा ॥ तोंतोंहर्षवाटतोचित्ता ॥ मजकल्प
नानाहींआतां ॥ गेलीअहंतानिःशब्द ॥ ८ ॥ जैसासूर्योदयहोतां ॥ तारांसमवेतचं
द्रमाअसतां ॥ तेंजलोपेजाणचित्ता ॥ झालेंसमस्तांविकारां ॥ ९ ॥ रात्रींचंद्राचाप्र
काशहोये ॥ दिनोदयींचंद्रींचसमावे ॥ चंद्रहोतांदर्शननोहें ॥ तैसेंझालेंमनादिकां
॥ १० ॥ कर्म[illegible]रावेंआपण ॥ तेव्हांशरीरचकरावेंठाण ॥ शरीरमींम्हणतांचजाण ॥
विकारउत्पन्नहो[illegible]ती ॥ ११ ॥ तरीशरीरींकर्मकरावेंकैसें ॥ हेंकांहींज्ञाननसे ॥ सां

---

१ रोगाचावाप २ दयासागरा ३ शेवट ४ मदिसणारा ५ उत्पन्न ६ नक्षत्रां सह ७ नाहिसाहोतो

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

 गाजैसेंअसेलतैसें ॥ कृपावशेंदयानिधी ॥ १२ ॥ ऐसीऐकोनिविनवणी ॥ बोलेसद्ग
 रुचूडामणी ॥ होससावधहोवोनी ॥ सांगतोंकरूनिवेगळी ॥ १३ ॥ तूंजंवजंवपृच्छा
करिसी ॥ तंवतंवआल्हादवाटेसांगावयासीं ॥ पारणेंझालेंवाचेसीं ॥ मजमानसींसु
खझालें ॥ १४ ॥ वाचेसींउपासपडलाहोता ॥ कांजेकोणहीहीहोयपुसता ॥ बहुतभाग्येंभे
टलासीश्रोता ॥ होईआतांसावध ॥ १५ ॥ अरेजोसद्गुरूचाअंकित ॥ जोझालादेहाती
त ॥ देहींसाक्षित्वेंअसत ॥ जैसेघरांतदीपक ॥ १६ ॥ घराचीराहटीनानापरी ॥ दी
पतोकांहींचनकरी ॥ तैसेंतुझेंनिवर्ततेंशरीरीं ॥ तूंवेगळानिर्धारीअससीकीं ॥ १७ ॥
हेंतूंकांयजाणतनाहींस ॥ कांजेंआत्मसत्तेंवर्तनशरीरास ॥ तूंचालवोनिसर्वांस ॥
अससीअविनाशवेगळा ॥ १८ ॥ तूंअनादिवेगळाआहेसी ॥ परीदेहसंगेंभुलला
सी ॥ आतांसांडोनसंदेहासीं ॥ करींकर्मासींआदरें ॥ १९ ॥ ज्यासींनाहींआत्मत्वाचें
ज्ञान ॥ तोम्हणेमीकर्मनसांडिन ॥ ज्ञानीकर्मकरितीआदरेंकरून ॥ साक्षित्वेंजाणवेग
ळेअसती ॥ २० ॥ नित्यनैमित्यकर्मकरिती ॥ साक्षित्वेंशरिरींवसती ॥ जेथींचेंतेथें
स्थापिती ॥ कोणेरीतीतेंसांगतों ॥ २१ ॥ जैशीस्फटिकशिळाज्यारंगावरीठेविली ॥
तैसीचअसेभासली ॥ परीरंगरूपेंनाहींआली ॥ करितीवहिलींकर्मेंतैसीं ॥ २२ ॥
गंगावनावरीदेख ॥ ठेविलाजरीस्फटिक ॥ तुकडेदिसतीअनेक ॥ परीस्फटिकफु

१ दर्पणें २ आनंद ३ ऐकणारा ४ आब्रा मानणारा वनगाईच्या शेपटीचे केंस.

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

टळानाहीं ॥ २३ ॥ जेंजेंकांहींकर्मकरी ॥ तैसाचदिसेशरिरीं ॥ परीसाक्षित्वेंअंत
रीं ॥ असेनिराधारींवेगळा ॥ २४ ॥ ज्याज्यावेळेजेंजेंकर्म ॥ तेंतेंकरीधरूनिप्रेम ॥
जनावाटतोसकाम ॥ परीतोनिष्कामअंतरीं ॥२५॥ जैसीसकामकर्मेंप्रीती ॥ तैसींच
ज्ञानीआदरेंकरिती ॥ साक्षित्वेंकर्मानोहेलिप्ती ॥ इतरकुंथतीकर्माभिमानें ॥ २६ ॥
जेआपुलेंसाक्षित्वनेणती ॥ तेचिकर्माभिमानेंकुंथती ॥ जेसाक्षित्वजाणती ॥ तेराह
तीवेगळेचि ॥ २७ ॥ शरीरकर्मेंवर्ततसेपाहीं ॥ परीत्यासींवर्तणेंनाहीं ॥ अभ्रधांवे
आकाशाचेठायीं ॥ धांवणेंनाहींआकाशा ॥ २८ ॥ आभाळचियेतजातसे ॥ परीआ
काशजैसेंतैसें ॥ तैसेंकर्मशरीरींभासे ॥ ज्ञातानसेलिप्ततेथें ॥ २९ ॥ अभ्रअसेगर्जना
करित ॥ परीआकाशनाहींकांपत ॥ तैसेंज्ञालेंशरीरकर्मांत ॥ नाहींभीतिनिश्चयीं
॥३०॥ आकाशींदिवसरात्रयेतीजाती ॥ परीआकाशाचीनपालटेस्थिती ॥ तैसेज्ञा
तेकर्मकरिती ॥ इतरभ्रमतीदेहसंगें ॥ ३१ ॥ जैसीकुलालचक्रींबैसलीमाशी ॥ चक्र
भोंवेपरीतेजैसीतैसी ॥ तैसेंशरीरकरीकर्मासी ॥ परीतोसाक्षित्वेंसींअचळ ॥ ३२ ॥
तैसेज्ञातेकर्माला ॥ जैसारथींजोआरूढला ॥ तोबैसेकानमोडतांफिरोनआला ॥
असेसंचलासाक्षित्वें ॥ ३३ ॥ ज्ञानीनिर्हेतकर्मकरित ॥ कांजेवेदमर्यादापाळित ॥
अज्ञानांआचरोनीदावित ॥ कर्मालावितबाळ्याभोळ्या ॥ ३४ ॥ ज्ञाताकर्मनकरी

१ घरचढला २ बसणारा ३ हेतु रहित.

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

काहीं ॥ तरीमूर्खनलागेतेसोई ॥ ऐसेंजाणोनियांपाहीं ॥ कर्मदेहींकरीतसे ॥ ३५ ॥
जैसेआंधळेआडमार्गीपडले ॥ तेडोळसयांहींमार्गीलाविले ॥ तैसेंज्ञात्यांनींकरूनि
दाविलें ॥ लाविलेंअज्ञजनमार्गी ॥ ३६ ॥ आंधळियासींपेण्यासींन्यावें ॥ तरी
आंधळ्याबरोबरचालावें ॥ उच्चनीचसांगावें ॥ करोपाहावेंहितत्याचें ॥ ३७ ॥ तैसें
ज्यांसींनाहींअंतरज्ञान ॥ तेअज्ञानआंधळेजाण ॥ तेधरितीअविद्येचेंआडरान ॥
कांजेभाननाहींआपलें ॥ ३८ ॥ ज्ञाताआपुलेंसर्वजाणत ॥ म्हणोनीत्यासींमार्गदा
वित ॥ येऱ्हवीतोकर्मातीत ॥ मिथ्याभासतकर्मत्याचें ॥ ३९ ॥ आंधळेमार्गीचाल
त ॥ परीउच्चनीचनाहींदिसत ॥ तेणेंझडाअसेखात ॥ मगवरळततेणेंदुःखें ॥ ४० ॥ मी
ज्ञाताअतिचतुर ॥ मजहूनिकोणीनाहींथोर ॥ वेदवक्तापाठांतर ॥ असेंसाचारमीचपैं
॥ ४१ ॥ मींएकआचरणशीळआहें ॥ माझ्यादृष्टीसमजसमकोणीचनये ॥ ऐसाअभिमान
करिताहे ॥ झडाखायेदचकत ॥ ४२ ॥ शरीराचीप्रतिष्ठाहोतां ॥ हर्षमानीफारचि
ता ॥ कांहींनिंदाऐकतां ॥ करीआकांततात्काळ ॥ ४३ ॥ जाणूनतरीनिंदाकरी ॥
दुष्टताभासलीअंतरीं ॥ माझ्याआचाराचीसरी ॥ पृथ्वीवरीनसेचिकीं ॥ ४४ ॥ मीं
काव्यव्याकरणजाणताहें ॥ ज्योतिषीमींतोहोय ॥ वेदशास्त्रींप्रवीणपाहे ॥ ऐसाझा
डाकरूनिसांगतो ॥ ४५ ॥ मीचएककाव्यकर्ता ॥ चौसष्टीकळांचाजाणता ॥ रागज्ञानी ॥ २ ॥

१ ढंच २ सखल ३ खोटें

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पुरता ॥ ऐसाहोयरचितामी ॥ ४६ ॥ जेणेंशरीरासींमहत्वहोये ॥ तेंतेंकरितांहर्षपा
हे ॥ जारणमारणशिकताहें ॥ झाडाकरीऐसियापरी ॥४७॥ मताभिमानवागविती ॥
आपुलालींकर्मेंस्थापिती ॥ तीर्थव्रतातेंदूषिती ॥ तेजाणचित्तींजात्यंध ॥ ४८ ॥ गुरू
म्हणवितीआपणासीं ॥ ज्ञानसांगेदुसरियासीं ॥ करणीनकरीतैसी ॥ त्यासीनिश्च
